
# किशोर

वर्ष ३ रे  अंक १ ला

जानेवारी १९७४

संपादक :
श्री. चिं. गो. सहस्त्रबुद्धे, संचालक

प्रकाशक :
श्री. बापूराव नाईक, नियंत्रक



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पुणे ४

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :
श्री वसंत शिरवाडकर : कार्यकारी संपादक
द्वारा नियंत्रक, पाठ्यपुस्तक मंडळ,  वार्षिक वर्गणी रु. ८
'नीलम' १०८, वरळी सी फेस रोड,
मुंबई, १८.

किरकोळ अंकाची किंमत ७५ पैसे

| | | |
|---|---|---|
| कविवर्य तांबे यांची शिशुगीते : वा. रा. ढवळे | ... | २ |
| कविवर्य तांबे यांचे हस्ताक्षर : राम देशपांडे | ... | ६ |
| विठू माझा भोळाभाळा : सरिता पदकी | ... | ९ |
| पाठांतर : वि. ह. कुळकर्णी | ... | १६ |
| सांबर : बाबा मोहोड | ... | १८ |
| झांथस हरला-इसाप जिंकला : पु. रा. बेहेरे | ... | १९ |
| घड्याळबाबा : कुसुमाग्रज | ... | २४ |
| काही बडबडगीते : शांता शेळके | ... | २५ |
| धूर्त पुरोहित : पंढरीनाथ रेगे | ... | २६ |
| रामाची सेना : मीरा निमकर | ... | २८ |
| असे हे विलक्षण जग : | ... | ३२ |
| सृष्टीतील नवलकथा : प्रकाश सावंत | ... | ३६ |
| सती : पुरुषोत्तम महाले | ... | ३७ |
| स्वाभिमान : चंद्रकांत देऊळगावकर | ... | ३९ |
| घुबड : बाबा मोहोड | ... | ४० |
| अन्याय ! अन्याय ! : मलिका अमरशेख | ... | ४१ |
| लीलाधर मामाच्या गोष्टी : (इंजिनाची गोष्ट) } विजय तेंडुलकर, श्याम जोशी | ... | ४३ |
| चित्रबोध-शब्दशोध : | ... | ४६ |
| आकाशदर्शन-जानेवारी : बाबूराव प. सावे | ... | ४७ |
| मुखपृष्ठ : श्याम जोशी | | |
| आतील सजावट : प्रभाशंकर कवडी, पद्मा सहस्त्रबुद्धे, राम नाईरकर, शशिकर तेंडुलकर, रमेश उमरोटकर, श्याम जोशी, ज्ञानेश सोनार. | | |

# राजकवी तांबे यांची शिशुगीते

: वा. रा. ढवळे :

**शिशूंसाठी गीते ती शिशुगीते. पाच ते दहा या वयाच्या; फारतर बारा वर्षे वयाच्या गटातील लहान मुलांसाठीच ती लिहिली जातात. त्या गीतांची शब्द-रचना त्या वयाच्या मुलांमुलींना पेलण्यासारखी असावी लागते. ज्या शब्दांचा अर्थ त्यांना सहज समजू शकेल, व ज्या शब्दांचा उच्चार करणे त्यांना सहज सोपे जाईल असेच शब्द शिशुगीतांत वापरावे लागतात. शिशुगीत लिहिण्यासाठी बालस्वभावाचे ज्ञान व निरीक्षण कवीला असावे लागते. शिशुगीत हे नाट्यगीतासारखे असले तरी ते, नाट्यगीत या आपल्या बहिणीसारखे असते. पुष्कळ वेळा शिशुगीत हे नाट्यगीतच असते. म्हणजे त्याचे स्वरूप वर्णनात्मक व संवादात्मक असते. शिशूंचे विचार व त्यांच्या कल्पना त्या गीतात व्यक्त होणे आवश्यक असते. शिशुगीत अगर नाट्यगीत लिहिणाऱ्या कवीला मुलांच्या जीवनाशी अगर इतरांच्या जीवनाशी व त्यांच्या भाषेशी समरस व्हावे लागते. आपण वयाने मोठे आहोत हे कवीला विसरावे लागते. मुलांच्या मनांत प्रवेश करून त्यांचेच विचार व त्यांचीच भाषा कवीला वापरावी लागते. "माझी मुले सभोवती दिसू लागताच माझ्या कवितेने मुलांची गाणी गायिली." असे खुद्द तांबे यांनीच लिहून ठेवले आहे.**

कविवर्य भास्कर रामचंद्र तांबे यांची उभी हयात माळव्यात, म्हणजे आजच्या मध्यप्रदेशात विलीन झालेल्या ग्वाल्हेर, इंदूर, देवास, धार, रतलाम वगैरे संस्थानांत गेली. तांबे यांचे प्रवेशपर्यंतचे शिक्षण देवासलाच झाले. त्यांच्या नोकरीची सुरुवातही तेथेच झाली. देवास संस्थानचे राजपुत्र खासेसाहेब पवार यांना शिकवण्याची कामगिरी त्यांच्याकडे होती. त्यांना शिकवताना व स्वतःच्या घरातील मुलांच्या सुखदुःखांत तल्लीन होऊन त्यांचे कौतुक करीत असताना, बालस्वभावाचा प्रत्यक्ष अनुभव त्यांना येऊ शकला. तांबे हे जात्या भावकवी होते. इंग्रजी वाङ्मयातील शिशुगीतांचा व नाट्यगीतांचा त्यांनी काळजीपूर्वक अभ्यास केला होता; किंबहुना म्हणूनच ते परिणामकारक शिशुगीते लिहू शकले. अशी गीते तांबे यांनी थोडीच लिहिली असलीत तरी ती मराठीतील अव्वल दर्जाची शिशुगीते आहेत.

आधुनिक कवींत दत्त, बालकवी, लक्ष्मीबाई टिळक यांनी अशा प्रकारची काही शिशुगीते लिहिली आहेत. तांबे यांनी या गीतांत अतिशय मोलाची भर घातलेली आहे. आकाशवाणी वरून त्यांची गीते अनेकदा गायिली गेल्यामुळे, अनेकांना ती परिचित झाली आहेत. पाठ्यपुस्तकात त्यांची निवड करण्यात आल्यामुळेही मुलांना ती तोंडपाठ असण्याचा संभव आहे. अशा काही गीतांचा या लेखात विचार करण्यांत येत आहे.

**चिवचिव चिमणी**



चिव चिव चिमणी छताऽत छताऽत
आरसा लोंबे भिंतीला भिंतीला
चिमणी पाहे सवतीला सवतीला
भरभर आली रागात रागात

या ओळींनी सुरू होणारी ही वर्णनपर कविता पुढे संवादात्मक बनते. अभिनय करून मुलांना ती म्हणता येण्यासारखी आहे.

एका दिवाणखान्यात एक भला मोठा आरसा टांगलेला आहे व त्याच्या काचेवर एक चिमणी बसली असून, आरशात पडलेल्या आपल्याच प्रतिबिंबावर रागारागाने चोचींचे प्रहार करीत आहे असे दृश्य कवीने सुरुवातीला वर्णन केले आहे. अशा चिमणीची काही मुलींनी कशी फजिती उडवली व शेवटी बिचारी चिमणी ओशाळल्यासारखी होऊन भर्रकन कशी उडून गेली याचे फार बहारीचे वर्णन या नाट्यगीतात तांबे यांनी केले आहे. हे वर्णन शिशुस्वभावाला धरूनच आहे. चिमणी आरशात पाहात असताना,

"चिऊताई, काय बघता ?"

असा प्रश्न एक मुलगी तिला विचारते. दुसरी तिच्या 'टच् टच्' आवाजाचे अनुकरण करून,

"काय करिता ?"

असा सवाल टाकते. तिसरी त्या चिमणीच्या अज्ञानाची जणू कीव करून,

"ती तर तुमची पडछाया"

असे तिला बजावते. आरशातील प्रतिबिंब हे जणू आपली सवतच— अगर दुसरी एखादी प्रतिस्पर्धी चिमणीच आहे; असे समजून त्यावर ती चोचीचे प्रहार करीत आहे, असे पाहून,

"उगीच शिणता का वाया ?"

या शब्दांत चौथी तिचा उपहास करते. ज्या पहिल्या मुलीने चिमणीला "काय बघता ?" असा सवाल केला होता ती व इतर

तीन मुली एकामागून एक चिमणीवर,

"फुटेल काच"

"पडेल खोऽच चोचीला"

"काय होईल सवतीला ?"

या प्रश्नांचा भडिमार करतात व सर्वजणी मिळून

"टाळ्या वाजवू या चट्चट्"

"पावले फिरवू या पट्पट्"

असे समूह-गीत म्हणू लागताच चिमणी भुर्रर उडून जाते व गीत संपते !

चिमणी आरशावर बसलेली आहे या साध्या प्रसंगातून आपल्या वर्णनकौशल्याने कवीने बालसुलभ, सुगम व सुंदर गीताची उभारणी केली आहे. मुले-मुली सारी एक होऊन एखाद्याची रेवडी कशी उडवतात याचे मार्मिक चित्रण या शिशुगीतात आढळते. या गीतातील 'सवत' हा शब्द कदाचित काही मुलांना अपरिचित असण्याचा संभव आहे. यमक जुळवण्यासाठी शत्रूवाचक दुसरा शब्द कवीला बहुधा सुचला नसावा रामाला राज्य न देता ते, आपला पुत्र भरत याला मिळावे असा दशरथ राजाशी हट्ट धरणारी व दुष्टावा साधणारी त्याची एक पत्नी कैकयी ही रामाची आई कौसल्या हिची सवत होय.

तर मग गट्टी कोणाशी ?



"तुझ्या गळां

माझ्या गळां

गुंफू मोत्यांच्या माळा..."

या ताईच्या शब्दांनी सुरू होणारे हे संवादात्मक नाट्यगीत आहे. बहीण व भाऊ यांच्यामधील तो एक संवाद आहे. भावा-बहिणीचा खेळ चालला असून, भाऊ बहिणीची थट्टा-मस्करी करीत आहे असा हा प्रसंग आहे. पण त्यात बालस्वभावाच्या, विशेषतः शृंगार व हास्यरसाच्या विविध छटा कशा मार्मिक रीतीने प्रकट झाल्या आहेत, हे पाहण्यासारखे आहे. आठ ते बारा या वयाच्या गटातील मुलांसाठी हे गीत आहे. ताईचे लग्न झालेले असून ती तात्पुरती माहेरी आलेली आहे, अशी कल्पना करून हे गीत रचलेले आहे. पूर्वी मुलगी आठ वर्षांची झाली की तिचे लग्न करून टाकण्याची प्रथा होती. ताई काहीही बोलली तरी त्यावर भाऊ कुरघोडी करून, तिची थट्टा-मस्करी केल्याशिवाय राहात नाही. ताईला बळे बळे चिडवणे हे एकच त्याचे ध्येय असते ! अशा रीतीने एकमेकांना चिडवणे हा मुलांचा स्वभावधर्मच असतो. त्या स्वभावाचेच चित्रण अशा उत्तर-प्रत्युत्तरातून या नाट्यगीतात तांबे यांनी मोठ्या विनोदी पद्धतीने केलेले आहे. मोत्यांच्या माळा दोघांनी गुंफण्याची ताईने सूचना केल्यावर,

"ताई, आणखी कोणाला ?"

असा प्रश्न केवळ ताईला चिडवण्यासाठी दादा करतो. त्यावर

"चल रे दादा, चहाटळा !"

अशी त्याची निर्भत्सना ताई करते. पण पुन्हा पूर्वीचे सारे विसरून,

"तुज कंठी

मज अंगठी"

ही दुसरी सूचना केल्याशिवाय ती थोडीच गप्प राहाते ? त्यावर दादाचा प्रश्न,

"आणखी गोफ कोणाला ?"

ताई उत्तरते—

"वेड लागले दादाला !"

"मला कुणाचे ? ताईला"

हे दादाचे पुन्हा उत्तर, त्या उत्तरावर पुन्हा ताईचे शेरे व पुन्हा दादाचे प्रत्युत्तर ! यांमुळे या नाट्यगीताला गती येते, रंग चढतो. याचे पर्यवसान

"दादा, सांगू बाबांला ?"

या ताईच्या धमकीत व शेवटी तिच्या रडण्यात होते ! त्या रडण्याचीही

"खुसू खुसू

गालि हसू—

वरवर अपुले रुसू रुसू —"

या आरोपाने दादा ताईची थट्टा करतो. जणू आपले बिंगच दादाने बाहेर काढले—यामुळे अपमानित होऊन ताई संतापून जाते व

"चल निघ येथे नको बसू"

अशी दादाला आज्ञा करते. पण दादा काय कमी वस्ताद असतो त्याला आपल्या हक्काची जाणीव असतेच. तो उत्तरतो—

"घर तर माझे तसू तसू !"

या उत्तराने ताई निरुत्तर होते. "ताईची कशी गंमत केली ?" या आनंदात दादा मग्न असताना ताई,

"आता गडी फू दादाशी"

असे म्हणून त्याच्याशी अबोला धरते न धरते तोच दादा विचारतो–

"तर मग गट्टी कोणाशी ?"

असा या नाट्यगीताचा शेवट मोठा सूचक व विनोदी झाला आहे !

पूर्वीच्या काळी मुली, नवऱ्याचे नुसते नाव काढले तरी लाजून जात. नवऱ्याच्या संबंधात त्यांची थट्टा केली की, त्या चिडत. समजूत न आलेल्या आठ ते दहा वर्षांच्या मुलीची ही अवस्था असे. अशा मुलीचे तांबे यांनी रंगवलेले हे चित्र आहे.

दादाचा विनोदी, थट्टेखोर स्वभाव व त्याचा हजरजबाबीपणा आणि ताईचा स्त्रीसुलभ चिडखोरपणा यांत जणू लुटुपुटूचे युद्धच जुंपलेले असून या जुगलबंदीत कोण हरतो, हे पाहाण्यापेक्षा ही जुगलबंदी ऐकण्यात मौज आहे. हे गीत अभिनय करून म्हणत असताना ऐकणे म्हणजे मोठी मेजवानीच ! टोल्याला प्रतिटोला हाणता हाणता या नाट्यगीताला रंग चढतो. लहान मुलांच्या स्वभावाचे मार्मिक निरीक्षण कवीने केले आहे, याच्या खुणा जागोजागी दिसतात. या नाट्यगीतातील विनोद उच्च दर्जाचा असून, वर्णनातील सूचकता अगर 'ध्वनी' उल्लेखनीय आहे. मराठी काव्य-वाङ्मयात सोज्वळ विनोदी कवितांचेच एकंदरीत प्रमाण अल्प आहे; मग त्यांत विनोदी नाट्यगीत आढळणे ही गोष्ट तर दुर्मिळच म्हटली पाहिजे !

## ते कोण गे आई ?



पुष्कळशी मुले जिज्ञासू असतात. एखादी नवीन गोष्ट पाहिल्यावर तीतील रहस्य जाणून घेण्याची त्यांची स्वाभाविक इच्छा असते. ते रहस्य उलगडल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही, हा आपला अनुभव आहे. मुलांच्या मनात कुतूहल निर्माण झाले की. वडील माणसांना निरनिराळे प्रश्न विचारून आपल्या मनाचे समाधान करण्याचा विशेषतः चौकसवृत्तीची मुले प्रयत्न करीत असतात. या कवितेत एक मूल अशीच एक शंका आईला विचारीत आहे, अशी कवीने कल्पना केली आहे. ही कविता ज्यावेळी प्रथम प्रसिद्ध झाली त्यावेळी तिचे नाव 'वारा' असे होते. कवितेचा विषय शीर्षकातच उघड केल्यामुळे तीतील रहस्यच संपुष्टात आल्यासारखे झाले होते. इ. स. १९३५ साली माधवराव पटवर्धनांनी तांबे यांच्या कवितांचे, त्यांच्याच लेखी संमतीने जे परिष्करण केले त्यात या कवितेचे मूळचे नाव बदलून "ते कोण गे आई ?" हे सूचक नाव तिला दिले. त्यामुळे वाचकांचे कुतूहल शेवटपर्यंत टिकून राहण्यास मदत झाली. रहस्याचा शोध घेण्याच्या मुलांच्या प्रवृत्तीला हे नवीन नाव पोषकच ठरले.

"नदीच्या शेजारी–गडाच्या खिंडारी
झाडांच्या ओळीत–वेळूंच्या जाळीत
दिवसा दुपारी–जांभळी अंधारी
मोडके देऊळ–त्यावरी पिंपळ
कोण गे त्या ठायी–राहते गे आई ?"

अशी या कवितेची सुरुवात आहे. 'गडाच्या खिंडारी', 'वेळूंच्या जाळीत', 'जांभळी अंधारी', 'मोडके देऊळ', 'पिंपळ' वगैरे शब्दांनी अद्भुत व भयानकरस कवीने निर्माण केला आहे. वेळूंच्या जाळी व मोडकी देवळे ही सापांची वसतिस्थाने मानतात. त्यांच्या निर्देशाने भयानकरसाचा परिपोष कवीने केला आहे. त्याचप्रमाणे 'जांभळी अंधारी', 'पिंपळ' या शब्दांनी भूत, समंध यांची संभाव्यता सूचित करून अद्भुतरसाचे वातावरण निर्माण केले आहे.

"कोण गे जोराने–मोठ्याने मोठ्याने
शीळ गे वाजवी–पांखरा लाजवी !
चिंचांच्या शेंड्यांना–वडांच्या दाढ्यांना
ओढोनी हालवी–कोण गे पालवी ?"

या वर्णनातील तांबे यांच्या कल्पनाशक्तीचा विलास विलोभनीय नाही असे कोण म्हणेल ? निसर्ग मोजक्या शब्दांत मूर्तिमंत डोळ्यांपुढे उभा करण्यात जसे तांबे यांचे वर्णनकौशल्य प्रकट होते, तसेच 'चिंचांच्या शेंड्या' व 'वडांच्या दाढ्या' या शब्दांनी विनोदनिर्मितीही त्यांनी साधली आहे. हास्य, अद्भुत व भयानक या तीन रसांचा सुंदर मेळ येथे साधण्यात तांबे यशस्वी झाले आहेत. वारा झाडे हलवतो, वेळूंतून शीळ घालतो–जी शीळ ऐकून पाखरांनीही लाजावे–पाण्यात भोवरे उत्पन्न करतो, पानांचा पाचोळा जिकडे-तिकडे भिरकावून टाकतो, नदीच्या किनाऱ्यावर असलेली झाडे जोरजोराने हलल्यामुळे त्यांचे नदीतील पाण्यात पडलेले प्रतिबिंब 'झाडांच्या साउल्या–नदीत कापल्या' असे वाटते. हासुद्धा प्रताप वाऱ्याचाच. हे सर्व वाऱ्याचे चाळे कवीने मोठ्या सूचकतेने वर्णन केले आहेत.

"उरात धडधडे–धावता मी पडे
पळालो तेथून–कोण ये मागून ?"

येथे कवीने नाट्यगीताचा शेवट केला आहे. आपल्यामागून कोण येत आहे ? भूत, समंध की आणखी कोणी ? या गोष्टीचा उलगडा मुलाला काही शेवटपर्यंत होत नाही. कधीकधी निवांतपणाचेही माणसाला भय वाटते. त्याप्रमाणे भीती वाटून मुलगा पळत सुटतो. त्याच्या उरात भीतीमुळे धडधड लागते ! भीतीने धूम पळत सुटणे हा अनुभव मुलांना काही नवीन नाही !







आपल्या वहिणीशी तुसडेपणाने अगर लागट बोलणाऱ्या भावाला, म्हणजे आपल्या मुलाला आई कसा हळुवारपणे उपदेश करते याचे मनोज्ञ चित्रण तांबे यानी या कवितेत केले आहे.

“माझ्या अंगणात–चिमण्यांची किलबिल
हळू पाय टाका–भुर्र उडूनी जातील !”

भुर्र उडून जाणाऱ्या चिमण्यांची उपमा माहेरवाशिणीला देण्यात तांबे यांनी ‘संसाराच्या मर्मा’लाच हात घातला आहे ! मुली काही दिवस माहेरी राहावयास येतात. त्यावेळी त्यांच्याशी भावाने आपल्या मनाचा तोल सांभाळूनच बोलले पाहिजे. त्यांच्या ‘किलबिली’ला पायबंद घालू नये. त्या रागावून सासरी निघून जातील असे काही वेडेवाकडे शब्द तोंडावाटे उच्चारले जाता कामा नयेत हे तांबे यांनी केवळ्या सूचकतेने येथे सांगितले आहे ! मुली एकदा सासरी गेल्या की, त्या थोड्याच वारंवार माहेरी येत असतात ? म्हणून त्यांचे अन्तःकरण दुखावले जाईल असे लागट शब्द भावाने तोंडातून बेसावधपणानेही उच्चारू नयेत असा मायेचा सल्ला आई आपल्या मुलाला देत आहे ही या कवितेची भूमिका आहे.

“वहिणीशी नको–वाकडा लावू बोल
आता की भाऊराया–सांभाळी तुझा तोल”

या ओळी त्या दृष्टीने विचारात घेण्यासारख्या आहेत.

“भ्रताराच्या राज्यी–उणे ठेवीना रे देव
वहिणीच्या मनी–चोळीची आशा ठेव”

या ओळींनी या नाट्यगीताचा अगर शिशुगीताचा शेवट साधण्यात तांबे यांनी औचित्य साधले आहे. नवऱ्याचे घर जरी समृद्ध असले, तेथे कसलीही उणीव मुलीला वाटत नसली—तरी तिला माहेरची ओढ असते व तिच्या मनात असलेली ‘माहेरच्या चोळी’ची आशा भावाने पुरवली पाहिजे हा आशय कवीने मोजक्या शब्दांत व सूचकतेने व्यक्त केला आहे. आईच्या हळुवार व प्रेमळ अंतःकरणाचीही कल्पना येथे ओघाने व्यक्त होते.

जावई सासरी आलेले आहेत हे पाहून ‘ताई’ची खवचट भावंडे ताईला कूटवजा प्रश्न विचारून कसे भंडावून सोडतात हे पुढील ओळींवरून सहज कळण्यासारखे आहे.

“लाजू नको ताई–डुंकू नको दारीतूनी,
खंत कोणाची ग ?–आलं कोणाचं ग कोणी ?
पाहुणा आला दारी–कुणी तरी ग रात्रीचा
पाही वहिणाताई–का ग तुझ्या ओळखीचा ?
वेणी फणी करी–घाईघाई घाली साज;
कोणी कोणाचं ग–सांजचं आलं आज ?
लाजू नको ताई–पाय धुण्या आणी पाणी
चांदीचे प्याले आणी–चांदीची चहादाणी”

ताईचे लग्न झालेले असले तरी वयाने ती फार तर दहा-अकरा वर्षांची असेल. अशा ताईबरोबर तिची लहान भावंडे कसा थट्टा-विनोद करीत आहेत हे तांबे यांनी मोठ्या मार्मिकपणाने वर्णिले आहे. शेवटच्या दोन ओळींत संस्थानी शिष्टाचार व पाहुणचार कसा असे याचे दर्शन घडवले आहे. तांबे यांची सारी हयात संस्थानी वातावरणात गेलेली असल्यामुळे तेथील सरंजामशाहीचा परिणाम त्यांच्या काव्यात प्रतिबिंबित व्हावा, हे साहजिकच म्हटले पाहिजे. ‘राजकन्या आणि तिची दासी’ या नाट्यगीतात ‘लपविलेल्या प्रेमाचे धागेदोरे दासीने आपल्या खुसखुशीत विनोदाने उकलून दाखविल्या’चे जे वर्णन आहे ते तांबे यांच्या संस्थानी वातावरणातील सरंजामशाही अनुभवाचेच द्योतक होय.

तांबे यांनी मुलांसाठी लिहिलेल्या कवितांत खेळ, दांडगाई, भातुकली, चिऊकाऊ, बागुलबुवा, लपंडाव असे प्रसंग जसे येतात, तसेच काही निसर्गवर्णनेही आढळतात. ‘पुंगीवाला’ हे तांब्यांचे एक कथाकाव्य आहे. देवासचे राजपुत्र खासेराव पवार यांना काव्याची गोडी लागावी, म्हणून त्यांनी ते लिहिले. ते शिशुगीत या सदरात मोडणारे नाही. पण त्यातील वर्णने बारा वर्षांच्या मुलांना कळतील अशी आहेत. म्हणून या कथाकाव्याचा येथे फक्त



उल्लेख केला आहे. मात्र ' रास-मंडळ गोपीचंदन ' या तांबे यांच्या कवितेतील निसर्गाचे व विशेषतः ' सायंकाळचे 'चे वर्णन शिशूंसाठी असल्यामुळे ती येथे उद्धृत करण्याचा मोह होतो,

" हिरवे हिरवे गार शेत हे सुंदर साळीचे
झोके घेते कसे ? चहुकडे हिरवे गालीचे—
लांब पसरले या ओढ्याच्या कांठाकांठाने
खळखळ सळसळ मिसळे मिळवू या आपले गाणे "

.................................................

" पिवळे तांबुस ऊन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर !
झाडांनी किती मुकुट घातले डोकिस सोनेरी !
अहा ! पहा तर सोन्याचा गोळा तो क्षितिजावळी ! "

.................................................

" पहा ! पाखरे चरोनी होती झाडांवर गोळा
कुठे बुडाला पलीकडे तो सोन्याचा गोळा ? "

मुलांनो, निसर्गाच्या सृष्टीतील ' सायंकाळ 'चे हे वर्णन किती कल्पक व प्रत्ययकारी आहे बरे ! या ओळी तांबे यांनी लिहिलेल्या आहेत हे सांगितले नसते तर त्या बालकवींनी लिहिलेल्या आहेत, असेच वाटले असते, नाही काय ?

---

# कविवर्य भा. रा. तांबे यांचे हस्ताक्षर

: राम देशपांडे :


**कविवर्य भा. रा. तांबे यांची यंदा जन्मशताब्दी साजरी होत आहे. त्या निमित्ताने महाराष्ट्राच्या या थोर कवीच्या हस्ताक्षरातील एक कविता आम्ही येथे देत आहोत. कोल्हापूरचे श्री. राम देशपांडे यांनी महाराष्ट्रातील थोर थोर व्यक्तींच्या हस्ताक्षरांचा संग्रह केला असून येथे दिलेली कविवर्य तांब्यांची कविता त्यांच्या संग्रहातील आहे.**

शालेय जीवनापासून मी महाराष्ट्रातील साहित्यिकांची हस्ताक्षरे जमवण्याचा छंद सुरू केला. जवळ जवळ २० वर्षे (१९५३ पासून) मी हा छंद सातत्याने सुरू ठेवला आहे. काम कष्टाचे, जिकिरीचे असते. पण हे माझ्या आवडीचे काम. त्यामुळे एखाद्या हस्ताक्षरासाठी पायपीट केल्यानंतर त्या पायपिटीला येणाऱ्या यशाचा आनंद काही निराळाच असतो. आज माझ्या संग्रहात सुमारे २५० चे वर हस्ताक्षर-नमुने असून या संग्रहातल्या दुर्मिळ हस्ताक्षरांत शाहीर रामजोशी, मोरोपंत, आगरकर, बालकवी, अण्णासाहेब कर्वे, गुरुदेव रानडे वगैरेंची हस्ताक्षरे आहेत. या हस्ताक्षरांचे प्रदर्शन मिरज, गोमंतक, हैद्राबाद येथे भरलेल्या साहित्य-संमेलनाच्या निमित्ताने भरवले होते. त्या प्रदर्शनास निरनिराळ्या क्षेत्रांतल्या व्यक्तींकडून चांगला प्रतिसाद मिळाला होता. महाराष्ट्रातल्या प्रमुख शहरांत या हस्ताक्षरांचे प्रदर्शन भरवण्याचाही माझा मानस आहे.

सोबत दिलेले कविवर्य श्री. भा. रा. तांबे यांचे हस्ताक्षर कोल्हापुरातील नाणावलेले शिक्षक श्री. गो. स. नणदीकर यांच्याकडून माझ्या हस्ताक्षरसंग्रहासाठी मिळाले. साहित्यिकांच्या हस्ताक्षरांच्या छंदाविषयी वाटणाऱ्या आपुलकीच्या पोटी त्यांनी आपल्या संग्रही असलेले हे मौल्यवान हस्ताक्षर मला दिले. श्री. नणदीकरांचे श्वशुर श्री. खंडोपंत कुलकर्णी यांच्याकडे बऱ्याच नामवंत साहित्यिकांचे जाणे येणे नेहमी असे. अशा साहित्यिकांत कविवर्य भा. रा. तांबे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. हस्ताक्षरातील हे पत्र कविवर्य भा. रा. तांबे यांनी ग्वाल्हेरहून दि. १९-२-१९३९ रोजी श्री. खंडोपंतांना लिहिलेल्या पत्रातील आहे. या पत्रात कविवर्य तांबे यांनी लिहिले आहे—

'मजकडून एखादी कविता आणवून देण्याविषयी आपण 'मनोहर' मासिकाच्या चालकांशी जवळ जवळ वचनबद्ध झालां आहांत असे आपल्या पत्रावरून दिसते. काही झाले तरी आपला शब्द रिकामा न जाऊं द्यावा एवढ्यासाठीच मी एक कविता या सोबत पाठवीत आहे. ती आपणास व 'मनोहर'च्या संपादकांस आवडो.'

सदरची कविता 'तरुणांस संदेश' या सोबत छापली आहे. ती आजच्या तरुणांना मार्गदर्शक होईल.



जन्म : २७-१०-१८७३ ] **राजकवी भास्कर रामचंद्र तांबे** [ मृत्यु : ७-१२-१९४१

ग्वाल्हेर संस्थानातील मुगावली या गावी जन्म. देवास हायस्कूलमधून अलाहाबाद विद्यापीठाची प्रवेशपरीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण. पहिला कवितासंग्रह प्रा. वा. गो. मायदेव यांनी १९२० साली प्रसिद्ध केला. दुसरा संग्रह १९२७ साली प्रसिद्ध झाला. संपादक दि. गं. केळकर (कवी अज्ञातवासी). तिसरा 'समग्र तांबे' हा कवितासंग्रह १९३५ साली प्रसिद्ध झाला. संपादक डॉ. माधवराव पटवर्धन (कवी माधव ज्यूलियन). ग्वाल्हेर येथे 'रजिस्ट्रार ऑफ एक्झॅमिनेशन'ची नोकरी. १९३७ साली सेवानिवृत्त. सेवानिवृत्तीपूर्वी ग्वाल्हेर संस्थानाधिपतींनी 'राजकवी'ही पदवी दिली.

## तरुणांस संदेश.

(वृत्त-मंदारमाला; राग-भूप; यतिंचा क्रम संगीतानुकूल ठेविला आहे.

होवास ये जे, स्वनेत्रांपुढें जें, त्या वर्तमाना करा साजिरें,
हेटाळुनी त्या अदृष्या भविष्या मध्यें बांधतां कां वृथा मंदिरें?
जी 'आज' आली घरा, माउली ती 'उद्याची' स्वकर्मीं झटा रंगुनी;
प्रासाद निर्मा स्वतांच्या उद्याचा इथें कर्मभूमीवरी जन्मुनी.
जो पाडि धोंडा अशक्ता, वली त्यावरी पाय रोवी, चढे तो वरी;
निःसत्व गाई करंटाच गाणीं स्वतांच्या स्थितीचीं, वहाणे करी.
हातीं विटा त्या, चुना तोच, भव्य स्वयें ताज त्यांचा कुणी तो करी;
कोणा न साधे कुटी ही; भविष्या रचाया हवें सत्व, कारागिरी.

—— x ——

सदर कवितेची 'प्रेस कॉपी' वेगळी करावी लागेल. कृपाकरून 'मनोहरच्या' संपादकांनीं तेवढे श्रम घ्यावे.

पुष्कळशे तरुण मजकडे हस्ताक्षर लिहून द्यावें म्हणून येतात ते हा 'कांहीं संदेश लिहून द्या' असें म्हणतात. कांहीं हितकर आणि पथ्यकर बोध त्यांच्या पदरीं पडावा यासाठीं ही कविता लिहिली आहे.

चि. सौभाग्यवती लीलाताई व गणपतराव यांस आशीर्वाद.

कळावें, लोभ असावा, हे विनंति.

आपला
भा. रा. तांबे.

# विठू माझा भोळा भाळा





: सरिता पदकी :

( पडदा वर जातो तेव्हा रंगमंचाच्या एका बाजूला चार खुर्च्या आणि दुसऱ्या बाजूला भिंतीला टेकवून ठेवलेले चार पाट दिसतात. बस्स् एवढीच आपली प्रॉपर्टी. जिथे खुर्च्या आहेत ती केशवराव गोळे यांची बैठकीची खोली आणि पाट आहेत ते त्यांचेच जेवणघर, एवढे सूचित झाले की पुरे झाले. जास्त प्रॉपर्टीबिपर्टीची गरजच काय मुळी ! आणि तीही असल्या निर्जीव प्रॉपर्टीची ?

आपल्या या नाटकातली आपली भक्कम प्रॉपर्टी आहे, सजीव ! नुसतीच सजीव नव्हे, तर चांगली नाचणारी-गाणारी, बोलणारी-बरळणारी ! ती प्रॉपर्टी आहे साधारणतः चौदा वर्षांची. होय, तिचेच नाव विठू. गोळयांच्या घरात विठू कामाला ठेवलेला आहे, का नुसतीच धांदल उडवायला हे कुणालाही अजून कळलेले नाही ; इतकी त्याची कामाची धांदल चालू असते. या गडबडीत तो काही मजेशीर प्रकारही करून जातो. ते आपण पाहाणारच आहोत. त्यासाठीच तर ही नाटिका. तसे तर विठूवर खूपच मोठे नाटक लिहायला हवे. पण सध्या आपण आपले एवढयाच ता वरून ताकभात ओळखूया.

तर विठू चौदा वर्षांचा गोळयांच्या घरातला गडी. रंगाने-काळासावळाच, पण डोळे मोठे लखलखीत. दिवसभर काम करून संध्याकाळचा शाळेत जातो. तेव्हा भाषा शुद्ध, डोके चलाख आणि कपडे स्वच्छ पण....

विठूमहाराज प्रवेश करतात ते काखोटीला कुंचा, हातात पाण्याची बादली, तिच्यात फरशी पुसायचे फडके आणि दुसऱ्या हातात बांबूवाला झाडू घेऊन. ही खोली जाम साफ करायचा त्यांचा बेत स्पष्ट आहे.

आल्या आल्या विठू बादली खाली ठेवतो आणि आपण कुठल्या कुठल्या केराचा निकाल लावायचा आहे, ते लक्षात यायला रंगमंचभर, वरखाली, नजर टाकतो. तोंडाने :

'विठू रे विठू, विठू रे विठू,
विठूला धरून पिटू रे पिटू' हे त्याच्यावर लोकांनी रचलेले गाणे.)

विठू : अरे रे रे रे रे रे ! काय हा कचरा. काय ही धूळ. अन् केवढया ह्या कोळिष्टकाच्या कमानी ! सारं साफ करायचंय. अन् तेही आत्ताच्या आत्ता. कारण आज पाहुणे यायचेत, गावचे. साहेबांचे काका, त्यांना शहरातली स्वच्छता नको का दिसायला ? ( बाईच्या आवाजाची नक्कल करीत. ) मला किनई, अग्दी एवढा म्हंजे एवढा केर चालत नाही घरात. आमच्या विठूकडनं लग्गेच साफ करून घेते मी तो. नाहीतर असतात एकेकाची घरं. उकिरडे बरे ग बाई त्यांच्यापेक्षा. घर कसं हवं ? चकचकीत, लखलखीत, आरशासारखं ! (स्वतःच्या आवाजात) तर घर आरशासारखं करायची नेमणूक झालीय या विठूची. चला विठोबा. लागा कामाला. (हातात बांबूवाला झाडू घेऊन वरची जळमटे काढायला लागतो. कामात नेहमीची धांदल. एकदोनदा झाडू कुठेतरी आपटतो, तर दोनचारदा विठू भिंतीवर. करता करता वरची दिव्याची शेड येते अन् टण्णकन् विठूच्या डोक्यावरच मुक्काम करते.)

अरे ! हे काय टणकन् वाजलं ! ( शेड पाहून ) हां ऽ, बरी रंगीत टोपी मिळाली. (शेड डोक्यावर घट्ट घालतो. झाडू लागतो. एक चिमणीचे घरटे येऊन अलगद त्या शेडवर उतरते.) चिव् चिव् चिव् चिव् ! टोपीचा मुगुट झाला ! (विठू आता पूर्ण विदूषकासारखा झालाय. कामाची धांदल चालूच. एवढयात पुष्पाताईंच्या हाका. 'विठू, अरे विठू,' हाका मारीत मारीत, पदराला हात पुसत त्या बाहेर येतात. त्याही कामाच्या खूप घाईत आहेत. पुष्पाताई चाळीशीच्या, उंच, शेलाट्या, घरकामात रस घेणाऱ्या, विठूवर कावणाऱ्या.)

पुष्पा : विठू, अरे ए विठू ! अरे काय चाललंय तुझं ?

विठू : काही नाही बाई, घर साफ करीत होतो. पाहुणे यायचेत ना. तुम्हीच तर म्हणालात....

पुष्पा : आणि हे डोक्यावर काय तुझ्या ?



विठू : डोक्यावर ना, मुगुट ! (एकदम जीभ चावत) नाही बाई, डोक्यावर ना, कचरा, वरचा ! झाडत होतो ना, तेव्हा पडला....

पुष्पा : इश्श, कचरा कसला, मेल्या शेड पडली ना शेड, दिव्याची....

विठू : (वरमून) होय बाई, चुकून पडली. काठीचा धक्का लागला....

पुष्पा : हेच ते हेच ते—नेहमीचं तुझं. जळमटं काढताना दिव्याला रे कशाला मेल्या काठी हाणलीस !

विठू : हाणली नाही बाई, लागली चुकून !

पुष्पा : म्हणे चुकून लागली. अशीच तुझ्या घालू का डोक्यात, काठी ! चुकून ?

विठू : नको बाई.

पुष्पा : का बरं ? घालते ना, चुकूनच.

विठू : नको हो बाई.

पुष्पा : का ? का पण ? घालतेच. तू कशी....

विठू : नको हो, नको. बाई, आत्ता माझ्या डोक्यात काठी घातलीत तर....

पुष्पा : लागेल डोक्याला थोडं तुझ्या ! एवढंच ना ? लागेल कसलं म्हणा काठीच तुटून जायची. इतकं भक्कम आहे डोकं मेल्याचं.

विठू : नाही बाई, काठी नाही तुटणार, पण आत्ता माझ्या डोक्यात काठी घातलीत—तर शेड मात्र फुटेल, शेड ! किती रंगीत अन् छानछान आहे ! नाही ती ? साहेबांनी फारि-नाहून आणलेली.

पुष्पा : बरीच अक्कल आहे गाढवाला.

विठू : अन् शेड फुटली तर फुटो, पण या वरच्या घरट्यातली अंडी फुटतील ना बाई, आपल्या चिऊताईंची. अन् मग चिऊ-ताईला किती वाईट वाटेल बरं. बिचारी भिर्रर्र भिर्रर्र घिरट्या घालीत बसेल घरट्याभोवती. परवा नव्हतं का अस्संच घरटं पडलं तिचं तर....

पुष्पा : बरं बरं ! लागली तुझी अक्कल चिमणीपुढे उडायला. पण हे बघ, आता सफाईचं काम हातात घेतलंयस—ते नीट पुरं कर. शेड पडली तर पडली. आणखी काही पाडू नकोस. सगळी जळमटं नीट काढ. मग सगळा केर काढ. मग खुर्च्या झटकून, फडक्यानं पुसून घे, अन् मग फरशी पुसून घे. फार पाणी ठेवू नकोस परवासारखं. नाहीतर पाहुणे आपले घरात आल्याआल्या पडायचे.

विठू : ( त्या कल्पनेने खिक्कन् हसू येते, पण ते सावरत ) होय बाई, म्हणजे नाही बाई.

पुष्पा : पटापटा कर हं सगळं काम. हे गेलेत आहेत त्यांना आणायला. त्याच्या आत इथली सफाई झाली पाहिजे.

विठू : होय बाई.

पुष्पा : सांग बघू, काय काय करायचं ? आलंय का नीट लक्षात बघू दे.

विठू : आधी फरशी नीट पुसायची.

पुष्पा : मूर्खा, आधी वरची सगळी जळमटं काढायचीत.

विठू : (गाण्यासारखं) हो, काढायची.....

पुष्पा : (गाण्यासारखं) मग खुर्ची झाडायची.....

विठू : (गाण्यासारखं) हो झाडायची.....

पुष्पा : (गाण्यासारखं) मग, केर काढायचा.

विठू : मग फरशी पुसायची....खूप पाणी घेऊन म्हणजे पाहुणे बरोब्बर आल्याआल्या....

पुष्पा : मूर्खा, फरशी नीट कोरडी करायची.

विठू : अन् बाई, खुर्च्या कधी पुसायच्यात !

पुष्पा : (चिडून) पूस जा तुला हव्या तेव्हा. तुझ्याशी बोलत बसायला मला नाही वेळ. माझा सगळा स्वंपाक व्हायचाय. पाहुणे यायच्या आत घर साफ व्हायला पाहिजे मात्र. (जातात.)

विठू : (जळमटं काढीत) चिऊताई चिऊताई

हाक मारितो विठू विठू
हिंव्या रानातून आला
तुझा ग भाऊ मिठू मिठू.

( त्याचं साफसफाईचे काम चालू असतानाच तीनचार मुले, आसपासच्या बिऱ्हाडांतून रहाणारी–गिरीश, शिरीष, सतीश, मनीष–धावत धावत येतात. ही थोडी विठूपेक्षा लहान, विठू त्यांचा मित्र. त्यांच्या अडीअडचणीला धावून जाणारा. मुले 'विठू विठू' ओरडतच येतात. विठू हातातले काम थांबवून त्यांच्याकडे बघतो.)

सतीश : (टाळ्या टाकीत) विठू, अरे विठूऽ—

विठू : काय रे ?

गिरीश : अरे लौकर चल, पतंग अडकला....

विठू : कुठे ?

मनीष :अरे, तारेवर....

विठू : (भाव खात) मग, अडकला तर आम्ही काय करावं ?

शिरीष : (काकुळतीनं) असंरे काय विठू, तू काढून दे ना पतंग. परवा नव्हतास का दिला ?

(विठू कुंचा घेऊन जोरजोरात केर काढू लागतो. जणू तो त्यांच्या गावचाच नाही. मग मुले जास्तच अजिजी करायला लागतात.)

सतीश : विठू, ए ऽ विठू, दे रे तेवढा....

गिरीश : असं काय रे विठू....

मनीष : प्लीज....विठू....विठोबा ऽ.... विठ्ठला ऽऽ....

विठू : (झाडता झाडता) प्लीज नाही न् ब्लीज नाही.... आपल्या-मागे काम आहे–जळमटं काढायचीत, केर काढायचाय, खुर्च्या पुसायच्यात, फरशी पुसायची, पाहुणे यायचेत आमच्याकडे–तुमच्यासारखं नाही....हं....उगीच छळू नका मला....चला चला....रिकामटेकडे कुठले....

सतीश : ए, एवढं र काय....

गिरीश : हे बघ विठू, तुझं काम आम्ही करायला लागतो. मग तर झालं........

(सगळ्यांनाच ही कल्पना पसंत पडते.... पोरे धावून कामाला लागतात. एक जण बादली घेतो, एकजण फडके घेतो, एकजण कुंचा, एकजण नुस्तेच काहीतरी करायला लागतो.)

विठू : बघा हं, आपणहून करताय तुम्ही काम, नाहीतर म्हणाल–विठूनं सांगितलं अन् घालाल गाळात मला....

सतीश : छे रे, असं कसं होईल ?

गिरीश : सतीश, फरशी पुसायचीय ना, हे बघ मी ओततो पाणी. तू घे पुसून सतीश....

विठू : खुर्च्या पण पुसायच्याएत....

(विठूचा केर चालू असतानाच गिरीश पाण्याची बादली खुर्च्यांवर ओततो. सतीश फडके घेऊन पुसू लागतो. केरात पाणी मिसळून बरबटा होतो. खुर्च्या ओल्याचिंब.)

मनीष : (विठूच्या डोक्यावरच्या शेडकडे लक्ष जातं.) अरे विठू, हे काय डोक्यावर तुझ्या ?

विठू : घरटं....चिमणीचं....

मनीष : अं हं.... त्याच्याखाली....

विठू : शेड दिव्याची, पडली, मघाशी....

मनीष : ए शिरीष, इकडे ये आपण ही दिव्याची शेड लावून टाकू ....म्हणजे कुणी काही म्हणायला नको....

शिरीष : अरे पण हात कसा पोचायचा, इतक्या वर ?

मनीष : खुर्ची घेऊ या, खुर्चीवर मी चढतो, माझ्या खांद्यावर तू उभा रहा.... अन् मग....

शिरीष : बघ हं, पडलो बिडलो तर....

विठू : बघा हं, पडला बिडलात तर....आपल्याकडे नाही....

(मनीष खुर्ची घेऊन येतो. लटपटत तिच्या हातावर उभा रहातो. विठू 'गोविंदा आला रे आला' गाणे म्हणू लागतो.)

मनीष : ए सत्या, चढ ना माझ्या खांद्यावर.

सतीश : बघ हं, नाहीतर मग म्हणशील....

मनीष : काही म्हणत नाही, लौकर ये....

विठू : लौक्कर रे बाबांनो, पाहुणे यायची वेळ झाली.... माझी फजिती कराल नाहीतर....

सतीश : हं, दे ती शेड....

(शेड घेतो. खुर्चीवर चढतो. आधीच लटपटत उभ्या असलेल्या मनीषच्या खांद्यावर चढायचा प्रयत्न करतो.) ए मनीष, लटपटतोयस काय असा ? नीट उभा रहा की....

विठू : होय नाहीतर पडेल ना तो.... सतीश शेड फुटेल हं ती. नीट धर.... अस्सा....

(सतीश जेमतेम खुर्चीवर चढतोय, तोच आतून पुष्पाताईंचे बोलणे—'अरे विठू, झालं की नाही तुझं आवरून ? जळमटं काढलीस का ? केर निघाला का, खुर्च्या, फरशी पुसलीस का ?'....

आणि बाहेरून दारातच रिक्षा थांबल्याचा आवाज. केशवरावांचा आवाज – 'या काका या, ते सामान द्या माझ्यापाशी, आणा आणा.')

विठू : अरे बाप रे ! पाहुणे आले....

( या सगळयाच आवाजांनी मुले गोंधळतात, सतीश व मनीष खुर्चीसह खाली पडतात. शेड पुन्हा विठूच्या डोक्यावर



टण्णदिशी मुक्काम करते. गिरीश, शिरीष त्या दोघांना उचलायच्या खटपटीत असतानाच....

काका व केशवराव प्रवेश करतात. केशवराव बेचाळीस वर्षांचे : पँट, बुशकोट, चष्मा, हसतमुख. स्वच्छतेची आवड असलेले. काका पन्नाशीचेः धोतर, सदरा, कोट, टोपी असा वेष. पहिल्यांदाच पुतण्याच्या घरी येताहेत, तेव्हा दृष्टीत कौतुक आहे. )

केशवराव : या या या काका ....

काका : आलो, आलो. बाकी छान आहे हं तुझं घर.... (असं म्हणता म्हणताच ओल्या फरशीवरून पाय घसरतो. पण ते थोडक्यात स्वतःला सावरतात.

या गडबडीत चारी मुले पळ काढतात. विठू गडबडीने खुर्ची उभी करून जाग्यावर ठेवतो. त्याच्या डोक्यावर शेड आहेच. खोलीचे रूपही केराने आणि पाण्याने बरबटलेले त्याच्या लक्षात आलंय. तो लगबगीने केर दाराआड ढकलतो. )

केशवराव : आणि बरं का काका, हा आमचा विठू. आमचा गडी. आता गडी म्हणायचं नावापुरतंच. घरातलाच झालाय आमच्या तो. त्याच्यावाचून करमतच नाही आम्हांला. घराची सारी साफसफाई हाच करतो. ( घराकडे थक्क होऊन बघत उभे ! )

काका : ( कौतुकानं ) हो का रे मुला ! अन् डोक्याला हे काय घातलंयस ?

केशवराव : विठू, काय रे हे ?

विठू : ( हसत हसत ) हे ना काकासाहेब, वरची जळमटं काढायची असली ना की नेहमी घालायला देतात बाई मला.

काका : होय ! कशाला ?

विठू : म्हणजे वरनं काहीबाही पडलं ना.... ( असे बोलतोय तोवर चिमणीचे दुसरे अर्धवट बांधलेले घरटे डोक्यावर पडते. त्याच्याकडे बोट दाखवून हसून ) हे हे असं....... तरी मग मला लागत नाही.

( केशवराव खोटे खोटे हसतात. )

काका : ( कौतुकाने ) असं ! बरीच हुशार आहे की रे सूनबाई ! ही युक्ती कुठं नव्हती हो पाहिली. बरीच काळजी घेता हं तुम्ही विठूची.

( केशवराव कसेबसे हसतात. शेवटी विठूकडे टक लावून बघतात अन् मग त्याचे ध्यान पाहून त्यांना खरेखुरे हसे फुटते. त्यांचे ते हसणे पाहून विठूला फार बरे वाटते. तोही हसतो. एवढ्यात पुष्पाताई लगबगीने येतात. काका आलेले बघतात. )

पुष्पा : हे काय ? तुम्ही कधी आलात, मामंजी ? ( केशवरावांना ) अन् मला नाही का हाक मारायची ! ( चटकन पुढे होत– मध्येच ओल्या फरशीवरून थोडा पाय घसरतो ) नमस्कार करते मामंजी. अहो, उभे का ? बसा ना बसा..... ( केशवराव आणि काका खुर्च्यांवर बसू लागतात. )



पुष्पा : विठू, साफ केल्यास ना खुर्च्या ?

केशवराव : (खुर्चीवर बसतात, लगेच उठतात) छी छी छी....ओल्या कशा काय ग या खुर्च्या ?

( विठू पटकन पुढे होतो. खुर्च्या पुसू लागतो, झटकू लागतो. काकांची, केशवरावांची आणि त्याची चांगलीच चुकवाचुकवी जुंपते. त्याच्या फडक्याचा एखादा फटकाही कुणाकुणाला बसतो. तो खुर्च्या पुसत असतानाच.... )

पुष्पा : ( संतापून ) विठू, काय करतोस हे ?

विठू : काही नाही बाई. खुर्च्या साफ करतोय....

पुष्पा : मग आधी नाही का करता आल्या ?

काका : असू दे, असू दे, सूनबाई....

( काका सूनबाईची समजूत घालत असतानाच विठू त्यांचीच खुर्ची पुसायला, झटकायला जातो. काका खुर्चीवर बसलेले उभे रहातात. विठू ती पुसतो. त्याचे झाले असे पाहून काका बसायला लागताच तो ती झटकायला लागतो. असे दोन चार वेळा होते.

केशवराव आणि पुष्पाताई हे दृश्य रागाने पाहात उभे. त्यांना बोलायचेही सुचत नाही.

विठूचा आणि काकांचा असा शिवाशिवीचा खेळ चालू असताना, रंगात आला असताना....

( दृश्य पहिले समाप्त–काही सेकंद काळोख. )

[ दृश्य दुसरे : स्थळ तेच. एक अर्ध्या तासानंतरची हकीगत. काका व केशवराव आत गेलेले. पुष्पाताई येतात. पाट मांडतात. रांगोळी काढायला लागतात. ]

पुष्पा :( रांगोळी काढत काढत ) अक्कल कशी ती नाहीच मेल्याला. पाहुणे आल्यावर साफसफाई करतात काय ? पाणी किती ओतून ठेवलेलं. सरासरा पाय घसरत होते....अन् खुर्च्या ओल्याचिम्ब. हा मारतोय फडकी मामंजींना......मूर्ख...... काढूनच टाकला पाहिजे गाढवाला .... तरी किती शिकवत असते सारखी .... काय म्हणाले असतील काका ? आमचं घर मारे स्वच्छ स्वच्छ म्हणून नावाजलेलं....अन् ते आल्यावर हा असा पसारा, कचरा....काय किंमत केली असेल त्यांनी !

( बोलता बोलता रांगोळ्या पुऱ्या करते. नीट निरखून पाहून घेते. आपल्याशीच खूष होऊन हसते. )

विठू, अरे विठू ! कुठं गेलास ? आवर रे बाबा, झराझरा कामं.

( असे म्हणत म्हणत स्वैपाकघरात निघून जाते. )

( विठू येतो. त्याच्या हातांत बादली अन् फडके. आता शेंडे अन् घरटे मात्र डोक्यावर नाही. तोंडाने गाणे. ' विठू रे विठू, तुला धरून पिटू पिटू.... ' पाट मांडलेले बघतो. )

विठू : च् च् च्! किती आवरलं तरी पसारा हा कायम ! मारुतीच्या शेपटासारखा. किती आवरा, आहेच, आहेच ! ( भराभरा पाट उचलून ठेवतो. ओल्या फडक्याने रांगोळी नीट पुसून घेतो. एवढ्यात आतून.... )

पुष्पा : विठू, अरे विठू ! झाला का रे पसारा आवरून ?

विठू : झाला, झाला बाई.

पुष्पा : हं, आता आत ये....

( विठू आत जातो. पुष्पा बाहेर येते. पाट उचललेले पाहाते, रांगोळी पुसलेली पाहाते. )

बाईबाई, विठ्या, अरे मांडलेले पाट म्हणजे पसारा वाटला होय तुला ! अन् रांगोळी म्हणजे केर ! ( पण हे ऐकायला विठू आहे कुठे ? पुष्पा पुन्हा पाट मांडते. पुन्हा रांगोळी काढते. यावेळी जरा भराभरा. ) मेल्याचं सगळं करणंच असलं. बिनडोकपणाचं, रांगोळी म्हणजे काय ते समजू नये ! अन् पाट म्हणजे काय पसारा ? काढूनच टाकते गाढवाला. ( बडबडत रांगोळी पुरी करते. लगबगीने आत जाते. विठू बादली न् फडके घेऊन परत येतो. पाटाकडे अन् रांगोळीकडे बघून संतापतो. )

विठू : हँ, काय घर आहे का भुताटकी ? आता सगळ उचलून, नीट पुसून गेलो होतो ना मी ? ( पुन्हा पाट उचलतो. रांगोळी नीट पुसून काढतो. त्याचे हे आवरणे चालू असतानाच पुष्पा येते. रागाने कडाडते. )

पुष्पा : मूर्खा, मी पाट मांडायचे न् तू ते उचलायचे हा काय खेळ चाललाय काय आपला ? नीट लक्षात ठेव आता.

विठू : पण बाई तुम्हीच तर पसारा....

पुष्पा : ( संतापून ) अरे, जेवायला मांडलेले पाट म्हणजे काय पसारा होयरे ? आता बघ हे पाट उचललेस तर ! अन् रांगोळी पुसलीस तर काय, तेवढंच करीत बसू काय मी ? आणि हे बघ....

विठू : ( आपल्याशी ) असा पसारा करतात या न्....

पुष्पा : अन् हे बघ.... आणखी एक काम आहे माझं. ऐकतोयस ना नीट ? शेजारच्या रानडे वहिनींकडे जा. वहिनी नसतील



घरी. मी आज पाकातल्या पुऱ्या करायला घेतल्यात, काका आलेत म्हणून. तर एक ताटली घे. सतीशकडे जा. अन् त्याला म्हणावं थोडी साखर अन् थोडी कणीक दे. कमी पडलीय म्हणावं आयत्या वेळेला. काय म्हणशील ?

विठू : कमी पडलीय म्हणावं आयत्या वेळेला.

पुष्पा : तसं नाही रे बावळटा. सतीशकडे जा अन् थोडी साखर अन् थोडी कणीक मागितलीय बाईंनी, असं म्हण. काय म्हणशील ?

विठू : थोडी साखर अन् थोडी कणीक मागितलीय बाईंनी.

पुष्पा : अस्सं ! आता कसा शहाणा झालास. अन् हे बघ हं. साखर अन् कणीक एकत्र नाही होऊ दयायची. आलं का लक्षात ? कणीक वेगळी आण अन् साखर वेगळी. ताटली घेऊन जा हो.

विठू : जातो. जातो.

पुष्पा : अन् लौक्कर ये.

विठू : येतो. येतो.

( दोघेही स्वैपाकघरात जातात. दृश्य दुसरे संपते. )

---

[दृश्य तिसरे : रंगभूमीच्या पुढच्या बाजूला एका कोपऱ्यात सतीश आणि विठू बोलत उभे. विठूच्या हातात एक ताटली. तसे ते बराच वेळ बोलत उभे असावेत. ]

विठू : ए सतीश, मिळाला का रे पतंग ?

सतीश : अरे नाही रे, तूच यायला हवंस बघ.

विठू : येईन हं येईन. दुपारी येईन. जेवणं-बिवणं आटपल्यावर..... खरंच. अरे सतीश, बाईंनी थोडी कणीक अन् थोडी साखर आणायला सांगितलीय, तुझ्याकडनं.

सतीश : कणीक ?

विठू : होय. आणि साखर. आणि दोन्ही मिसळायचं नाही एक-मेकात असं सांगितलंय.

सतीश : आणतो हं. (आत जातो. एका वाटीत साखर, एका मोठ्या वाटीत कणीक आणतो ) हं, घे. कशात घेशील ?

विठू : ही काय, ताटली आणलीय ना.

सतीश : हं, ही घे कणीक. ( कणीक ताटलीत ओततो. ताटली भरून जाते ) अरे, ताटली तर कणकीनंच भरली. ही घे साखर. घे अशी एका बाजूला.

विठू : छे छे, अरे कितीही बाजूला घेतली तरी कणीक अन् साखर एकत्र होणारच. अन् मग रागावतील बाई. आज आधीच गरम झाल्यायत त्या. त्यापेक्षा अशी ताटलीच्या मागच्या भागावर साखर घालना. मी नेईन जपून. ( ताटली पालथी घालतो. कणीक सगळी सांडून जाते. तो पाहताच राहातो. एवढ्यात पुष्पाताईंची हाक येते....'विठू, अरे ये रे लौक्कर'.) बरं, आता साखर घाल लौकर. घाल.

( सतीश पालथ्या ताटलीवर साखर घालतो. विठू ताटली अगदी जपून धरून घेऊन जाऊ लागतो. ) जातो रे....

सतीश : मग ये रे पतंग काढून दयायला.... ( विठू हळू हळू एकेक पाऊल टाकत हातात ताटली जपून धरत येतो. पुष्पा जेवण घरात त्याची वाटच पाहात उभी आहे. )

पुष्पा : ( विठूला ) हं, शाब्बास ! आणलीस ना साखर ?

विठू : हो बाई, अगदी जपून आणली. ही बघा.

पुष्पा : अन् कणीक कुठाय ?

विठू : ही बघा ना.... ( कणीक दाखवायला ताटली उताणी करतो. साखर अर्थातच सगळी सांडून जाते. )

पुष्पा : (संतापून) हात् मूर्खा. कणीकही गेली अन् साखरही घालवलीस.

विठू : पण तुम्हीच तर म्हणाला होतात....

पुष्पा : ( रागातच ) काय म्हणाले होते ?

विठू : की साखर अन् कणीक मिसळू देऊ नकोस म्हणून....

पुष्पा : ( डोक्याला हात लावून मटकन बसत ) अरे देवा, अरे म्हणून का....कसला रे गडी मिळालाय मला....शहाण्याचं व्हावं चाकर, पण मूर्खाचं होऊ नये धनी.... ( संतापून उभ्या रहात ) विठ्या, गाढवा, तू आत्ताच्या आत्ता चालता हो माझ्या घरातनं. जा, जा. दृष्टीसमोर नकोयस तू मला. चल, चालता हो.

( विठू अत्यंत वाईट तोंड करून उभा असतानाच दृश्य समाप्त. )

---

[ दृश्य चौथे : विठू रंगमंचाच्या मध्यभागी बसलेला. सोबत अंथरुणाची अन् कपड्यांची छोटीशी वळकटी, खरोखरच घर सोडून जायच्या तयारीत. ]

विठू : ( खिन्न ) तर आता हे घर सोडून जायचं. जायचं. जा, म्हटल्यावर जायलाच हवं. जा काय रोजच म्हणतात बाई, पण आज अगदी खरंखुरं म्हणाल्या. जायचं. कुठं जायचं ? जायचं कुठं तरी. दुसरं काम शोधायचं. काम काय ? मिळेल कुठंही. पण....पण हे असं घर कुठं मिळेल ? हे असं घर, असा पसारा, अशा खुर्च्या, अशी शेड, असं घरटं, अन्.... अन् असे मायेनं वागवणारे बाई अन् साहेब ! शाळेत पाठवणारे; नवे कपडे, पुस्तकं घेणारे; विठूला सोडून एक घास न खाणारे; विठू विठू करणारे. ( शर्टाच्या बाहीला डोळे पुसतो. ) पण काय उपयोग ? मीच चुकलो ना ? मुद्दाम नाही, पण आपोआप चुकलो ना ? तसा चुकतो रोजच. पण आज जरा जास्तच···· ( कशीबशी वळकटी उचलतो. कष्टाने उभा रहातो. एवढ्यात पुष्पा, केशवराव येतात. )

पुष्पा : अरे विठ्या, मेल्या जेवलास का ? का उपाशीच आहेस ?

केशव : काय विठ्ठलपंत, कशा लागल्या पाकातल्या पुऱ्या ? ( हा प्रश्न ऐकताच विठूला रडूच कोसळते. )

पुष्पा : हॅत् गाढवा, रडायला काय झालं तुला !

केशव : अन् ही वळकटी घेऊन निघालास कुठं ?

विठू : (रडतरडत) मी घर सोडून चाललो साहेब....बाईंनी सांगितलं ....जा म्हणून.... मघाशी....

केशव : (पुष्पाला रागाने) होय का ग !

विठू : (रडत) होय साहेब. मी फारच त्रास दिला त्यांना. सगळा गोंधळ गोंधळ करून ठेवला.

पुष्पा : हॅत् रे मूर्खा ! अरे, तू गोंधळ केलास म्हणून मी रागावले. फिटं फाट झाली. म्हणून काय घर सोडून जायचं !

केशव : अरे, तू गेलास तर आमचं कसं व्हायचं ?

पुष्पा : (हसून) होय ना, घरात गोंधळ कसा व्हायचा ! अन् घर 'स्वच्छ' कसं व्हायचं ! चल चल, वळकटी ठेव ती. कुठ्ठं जायचं नाही. मेल्या, तुझं दुसरीकडे कुठं कसं जमेल !

केशव : अरे, तू आहेस म्हणून घराला शोभा आहे आमच्या. जरा गोंधळ, गडबड, हसणं, नाचणं.... चल चल, ठेव ती वळकटी.

पुष्पा : घर सोडून जातोय, मूर्ख !

(विठू वळकटी खाली ठेवतो. हळूहळू हसतो. मग गाऊ लागतो )....

विठू रे विठू विठू रे विठू
विठूला धरून पिटू रे पिटू

(एवढ्यात सतीश, गिरीश, शिरीष, मनीष येतात. त्यांच्या हातात लहान दोऱ्यांना बांधलेले रंगी-बेरंगी पतंग आहेत. विठूभोवती फेर धरून पतंग थोडेसे उडवीत तेही गातात.)

विठू रे विठू, विठू रे विठू
तूच आमुचा मिठू रे मिठू
फेर धरून टाळ्या रे पिटू
आम्हांला हवा रे हवा रे विठू

(गाणे व फेर ऐन रंगात आले असतानाच....)

**प ड दा**

(या नाटिकेच्या प्रयोगाच्या परवानगीसाठी सौ. सरिता पदकी, दशभुज गणपतीसमोर, कर्वे रोड, पुणे ४ या पत्त्यावर लिहावे.)

## 'किशोर'च्या फेब्रुवारी अंकात—

### बालकलावंतांची चित्रे

गेल्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये मुंबईस महाराष्ट्र सरकारच्या कलासंचालनालयातर्फे बालकलावंतांच्या चित्रांचे एक प्रदर्शन भरले होते. छोट्या कलावंतांची प्रदर्शनातील चित्रे पाहून छोट्यांनाच नव्हे तर मोठ्यांनासुद्धा कोण आनंद झाला ! मुलांच्या तरल कल्पनाशक्तीची येथे जणू चढाओढ लागली होती. 'किशोर'मध्ये मुलांसाठी सुंदर सुंदर चित्रे काढणारे चित्रकार श्री० प्रभाशंकर कवडी हे बालकलावंतांची ही चित्रे पाहून आपल्याला काय वाटले ते फेब्रुवारीच्या अंकात तुम्हांला सांगणार आहेत. शिवाय त्याबरोबर या बालकलावंतांच्या चित्रांतील काही निवडक चित्रे आम्ही त्या अंकात देणार आहोत.

—संपादक

### पक्याची गँग

तुमच्या आवडत्या 'पक्याची गँग' या गोष्टीचा पुढचा भाग लेखकाच्या काही अडचणींमुळे या अंकात आम्ही देऊ शकलो नाही, याबद्दल तुम्ही आमच्यावर रागावणार हे आम्हांला माहीत आहे; पण पुढच्या म्हणजे फेब्रुवारीच्या अंकात पक्या आपली गँग घेऊन नक्की येईल याची आम्ही तुम्हांला खात्री देतो.

—संपादक

'किशोर' डिसेंबर १९७३ मधील 'चित्रबोध-शब्द-शोध' या सदरातील कोड्याची बिनचूक उत्तरे पाठवणाऱ्यांची नावे :

१. राजश्री अनंतराव जोशी, कॅसलरॉक.
२. अरुण आनंदराव जांभळे, सातारा शहर.
३. सुधीर व सुहास मुकुंद संत, पुणे.
४. किशोर व किरण रामचंद्र देशमुख, मुलुंड.
५. प्रीती धबडगावकर, नागपूर.
६. प्रवीण जामसांडेकर, वांद्रा-मुंबई.
७. हेमकांत शशिकांत नावडीकर, पुणे.
८. नंदकुमार म. परांजपे, गिरगाव-मुंबई
९. लीना इंद्रजीत तावडे, गिरगाव-मुंबई.
१०. विजयकुमार वामन परूळकर-मुंबई
११. विद्या बळीराम नार्वेकर-मुंबई.
१२. चित्रा चंद्रकांत देवरुखकर-मुंबई.
१३. राजन दाभोळकर-मुंबई.
१४. सुमन पांड्ये-मुंबई.
१५. श्रीनिवास स. निमकर, पुणे.
१६. योगेश दिवेकर, माहीम-मुंबई.

सूचना : प्रत्येक महिन्याचे उत्तर १५ तारखेच्या आत कार्यालयाला पोचणे आवश्यक आहे.

# पाठांतर

: प्रा. वि. ह. कुळकर्णी :

हल्लीच्या शिक्षणक्रमात पाठांतराला फारसे महत्त्व दिले जात नाही. विद्यार्थ्यांनी स्वतंत्र बुद्धीने विचार करण्यास शिकले पाहिजे हा चालू शिक्षणपद्धतीतील एक महत्त्वाचा सिद्धान्त मानला जातो. नुसत्या पोपटपंचीला काय किंमत आहे ? ते काही खरे ज्ञान नव्हे. एका दृष्टीने ही विचारसरणी बरोबर आहे. परंतु त्याची दुसरी बाजूही पाहिली पाहिजे. आपल्या प्राचीन शिक्षण-पद्धतीत पाठांतर हेच विद्यार्जनाचे एकमेव साधन मानले जात असे. त्याचे एक मुख्य कारण म्हणजे त्यावेळी मुद्रणकलेचा शोध लागला नव्हता, म्हणजे छापखाने नव्हते. त्यामुळे सर्व काही मुखोद्गत करावे लागे. हजारो वर्षांपूर्वी रचले गेलेले वेद हे आज ग्रंथरूपाने आपणास उपलब्ध झाले आहेत. याचे कारण म्हणजे ते तत्कालीन पंडितांनी वंशपरंपरेने मुखोद्गत केले होते. गेल्या वर्षी नासिक येथे वेदपठण करणाऱ्या पंडितांना आपले राज्यपाल अलियावर जंग यांच्या हस्ते सरकारी पारितोषिके देण्यात आली. अनेक लोकांनी या समारंभावर टीका केली होती, कारण आज 'वेद हे पुस्तकरूपाने छापले गेले असल्यामुळे आता या वेदपठणाला काहीच महत्त्व उरले नाही'. या टीकेस उत्तर देताना राज्यपालांनी असे सांगितले की ही पारितोषिके देण्याची परंपरा चालू ठेवलीच पाहिजे. कारण वेदपठण ही एक कला आहे. आज आपण ग्रंथांत छापलेले वेद वाचू शकतो हे खरे; परंतु ते पूर्वी कसे म्हटले जात हे आजच्या या शास्त्री-पंडितांच्या मुखानेच आपणाला कळू शकते आणि म्हणून ही पारितोषिकांची परंपरा आपण चालू ठेवलीच पाहिजे. राज्यपालांनी पुढे सांगितले की त्यांच्या वडिलांनी सबंध कुराण तोंडपाठ केले होते; एवढेच नव्हे तर वेदही पाठ केले होते! कुराण एका विशिष्ट तालबद्ध संगीतपद्धतीने कसे म्हटले जात असे, यालाही महत्त्व आहे. तेच महत्त्व वेदपठणालाही आहे. आजही गणेशोत्सवात जेथे मंत्रजागर केला जातो, तेथे परस्परांसमोर बसलेल्या दोन रांगांतील शास्त्री-पंडित एकमेकांना जणू आव्हान देत असल्यासारखे वेदपठणाची जुगलबंदी करतात, तो प्रकार मोठा श्रवणीय वाटतो. वेद विशिष्ट छंदांत रचलेले असून ते आरोह अवरोहात म्हटले जातात. त्यात एक प्रकारचे संगीत असते.

मुद्रणकला अस्तित्वात नसल्यामुळे प्राचीन काळची वाङ्मयरचना श्लोकांतून करण्यात येत असे. कारण पाठ करण्यास ते सोयीचे जाते. कथा-कविताच काय, परंतु तत्कालीन शब्दकोश, व्याकरण, गणित, वैद्यक, ज्योतिष वगैरे शास्त्रीय ग्रंथही श्लोकपद्धतीने लिहिले जात. म्हणजे त्यावेळची सर्व विद्वत्ता ही पंडितांच्या जिभेवर असे. सर्व काही तोंडपाठ! आता संस्कृत ही मृतभाषा म्हणून शाळा-कॉलेजांतून तिचे उच्चाटन होत चालले आहे. परंतु दोनतीन पिढ्यांपूर्वी संस्कृतभाषेला फार महत्त्व दिले जात असे. त्या वेळच्या विद्यार्थ्यांकडून अमरकोश समासचक्र, शब्दरूपावली, गीता, अनेक स्तोत्रे, रामरक्षा व रघुवंशातील काही सर्ग घरीच पाठ करून घेतले जात असत. अमरकोश म्हणजे संस्कृत शब्दांची विशिष्ट पद्धतीची डिक्शनरीच होय. ज्यांना लिहिता-वाचता येत नसे, अशा स्त्रियांनाही अनेक मराठी स्तोत्रे पाठ असत. आजही कित्येक शाळांतून गीतेतील महत्त्वाचे अध्याय पाठ करवून घेतले जातात व या गीतापठनाच्या स्पर्धाही जावल्या जातात. भेंड्या लावण्याच्या पद्धतीमुळे अनेक श्लोकांचे पाठांतर होत असते. लहानपणी विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती तीव्र असते. त्यामुळे विद्यार्थिदशेत पाठांतर करणे सुलभ जाते व लहानपणी पाठ केलेले पुढे केव्हाही विसरले जात नाही. पाठांतरामुळे जिभेला वळण लागते व वाणी शुद्ध व स्पष्ट होते. आजच्या लोक



शाहीच्या काळात वक्तृत्वकलेला फार महत्त्व आहे. जे लोकसभेत उत्तम भाषण करतात, त्यांचा प्रभाव विशेष पडतो. धुरीण वक्त्यांची भाषणे ऐकायला हजारो श्रोते गोळा होतात. शाळा-कॉलेजांतूनही वक्तृत्वस्पर्धा ठेवल्या जातात. वक्तृत्वकलेला पाठांतराची फार आवश्यकता असते! योग्य संदर्भात सुभाषिते किंवा थोर व्यक्तींची वचने यांचा वापर केला, तर भाषणात चटकदारपणा व भारदस्तपणा येऊन ते परिणामकारक होते.

पाठांतराच्या बाबतीत एकदोन गोष्टी येथे सांगण्यासारख्या आहेत. गोपाळ कृष्ण गोखले हे कॉलेजात विद्यार्थी असताना त्यांना असे आढळून आले की महाराष्ट्रीय लोकांना सफाईदार इंग्रजी बोलता येत नाही, असा प्रवाद सर्वत्र पसरला आहे. हा प्रवाद नव्हता तर ती वस्तुस्थिती होती. तेव्हा आपण इंग्रजी भाषेचा अभ्यास करून सफाईदार इंग्रजीत भाषण करण्यात प्रावीण्य संपादन करावे, असे त्यांच्या मनाने घेतले. जगातील उत्तमोत्तम वक्त्यांत इंग्लंडमधील एडमंड बर्क याचा समावेश केला जातो. त्याच्या लेखनात आणि भाषणात गंभीर व भारदस्त विचारसरणी आणि तद्नुरूप सुंदर व सफाईदार भाषा यांचा मधुर मिलाफ झालेला आढळून येतो. गोपाळराव गोखले यांनी बर्क यांच्या लेखनातील व भाषणांतील उत्कृष्ट उतारे मुखोद्गत केले होते. मिल्टन कवीच्या 'पॅराडाइज लॉस्ट' या महाकाव्यातील काही सर्ग, ग्लॅडस्टन व जॉन ब्राइट यांची भाषणे आणि वॉरन हेस्टिंग्ज याच्या पार्लमेंटपुढील चौकशीच्या वेळी बर्क यांनी केलेले उत्कृष्ट भाषण—ही सर्व गोखले यांनी अशी काही आत्मसात केली होती की, सदाशिव पेठेतील आपल्या शेजाऱ्यांच्या हाती पुस्तक देऊन 'आपल्या पाठांतरात एक चूक निघाली तर एक आणा दंड देईन' अशी पैज ते मारीत असत आणि आश्चर्याची गोष्ट अशी की त्यांना एकदाही दंड भरावा लागला नाही! गोखले पुढे राजकीय क्षेत्रात उतरले. बनारस येथे भरलेल्या काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले व वरिष्ठ कायदेमंडळाचे एक कर्तबगार सभासद म्हणूनही ते गाजले. बजेट म्हणजे अंदाजपत्रक हा आकडेमोडीचा एक अत्यंत रुक्ष विषय, परंतु त्यावर गोखले यांनी केलेली भाषणे त्यावेळी फार वाखाणण्यात आली. राजकारणात भाग घेण्यासाठी त्यांनी फर्ग्युसन कॉलेजच्या प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला. त्यावेळी त्या कॉलेजचा निरोप घेताना त्यांनी जे भाषण केले, ते वाचून पाहावे म्हणजे त्यांच्या वक्तृत्वकलेचा एक सुंदर नमुना पाहावयास मिळेल. त्यांची भाषणे पुस्तकरूपाने छापून प्रसिद्ध झाली आहेत.

अचाट पाठांतरासंबंधीची दुसरी गोष्ट म्हणजे हरिभक्तपरायण पांगारकर यांची. त्यांच्याइतका रसाळ प्रवचनकार मी अजून पाहिला नाही. त्यांनी मोरोपंतांचे चरित्र लिहिले आहे. आपल्या आत्मचरित्रात पांगारकरांनी पंढरपूरला आलेल्या रामकृष्णबुवा या वारकऱ्याची एक हकिकत सांगितली आहे. तो ज्ञानेश्वरीभक्त होता. संपूर्ण ज्ञानेश्वरी त्याला पाठ होती. इतकेच काय, पण कोणत्याही श्लोकावरील ज्ञानेश्वरीतल्या ओव्या तो उलटयासुलटया म्हणू शके व कोणताही ज्ञानेश्वरीतला शब्द विचारला तर तो कोठे कोठे आला आहे हे तो त्या त्या ओव्या म्हणून संदर्भासह त्यांचा अर्थ सांगे!



आता खुद्द पांगारकरांसंबंधीची गोष्ट! मोरोपंतांच्या चरित्राची माहिती गोळा करण्याकरता पांगारकरांनी ठिकठिकाणी प्रवास केला व अनेकांची पोथ्या-दप्तरे वाचून पाहिली. कोल्हापूरला एका वैद्याकडे पोथ्या-पुराणांचा व हस्तलिखितांचा संग्रह आहे असे पांगारकरांना जेव्हा कळले तेव्हा त्यांनी त्याच्या घरी जाऊन तो पाहाण्याचे ठरवले. हा वैद्य अत्यंत विक्षिप्त व तामसी असून त्याच्या घरी आलेल्याला शिव्या देई व खवळला तर काठीने त्याला बडवून काढीत असे पांगारकरांस सांगण्यात आले. परंतु पांगारकर म्हणाले, "मोरोपंतांच्या हातचे कागदाचे एखादे चिटोरे मिळाले तरी शिव्या व मार खाण्यातही मला अत्यानंद होईल." पांगारकर शोध करीत त्या वैद्याकडे गेले. सकाळच्या दहाचे कडक ऊन पडले होते. घरकामावर सुतार-गवंडी लावून त्यांच्या कामावर देखरेख करीत वैद्यराजांची स्वारी उभी होती. पांगारकरांनी त्यांना नमस्कार करून आपण कशाकरिता आलो

# सांबर

सांबराला वाटले
करावी शेती
उकरली त्याने
मणभर माती

विहीर केली
पाट केले
वाफ्यावाफ्यात
पाणी नेले

धावतपळत
रानात गेला
बियाणे घेऊन
परत आला

आणि एक
गंमत झाली
शिंगांनाच
पाने आली !



— बाबा मोहोड

ते सांगितले. वैद्यबुवा म्हणाले, "मला तुमच्याशी बोलायला वेळ नाही." केव्हा सवड मिळेल असे पांगारकरांनी विचारले. "तेथे उभे राहा" म्हणून वैद्यराजांनी त्यांना सांगितले व दोन तास उन्हात उभे ठेवले. बारा वाजले तेव्हा सुतार-गवंडी जेवायला निघून गेले. जिन्याच्या पहिल्या पायरीवर उभे राहून वैद्य म्हणाले, "तुम्ही मोरोपंतांच्या कवितेचा अभ्यास केला आहे काय ?" "हो, थोडाफार केला आहे " पांगारकर उत्तरले. यावर वैद्यराजांनी एकामागे एक अशा पाच आर्यांचा अर्थ व कथा संदर्भ त्यांना विचारला. सुदैवाने त्या पाचही आर्या पांगारकरांना पाठ होत्या. वैद्यांनी प्रथम चरण म्हणताच पांगारकरांनी सबंध आर्या म्हणावी, अशी ही तोंडी परीक्षा झाली व त्यांत पांगारकर उत्तम रीतीने पास झाले. पुढे हे दोघे वर गेले. सतरंजीवर बसल्यानंतर वैद्यांनी विचारले, "पंतांच्या किती आर्या तुम्हांला पाठ आहेत ?" "फार नाहीत, पण चारपाच हजार आर्या आता माझ्या तोंडात आहेत—" पांगारकर म्हणाले. त्यांचे पाठांतर दांडगे असल्याची वैद्यराजांची खात्री झाली व त्यांनी पांगारकरांना त्यांच्या संग्रही असलेले ग्रंथ व कागदपत्र तर दाखवलेच; परंतु मोरोपंतांच्या हरिश्चंद्राख्यानाची मूळ प्रत त्यांच्याजवळ होती ती ही पांगारकरांना त्यांनी बक्षीस दिली.

कोल्हापूरच्या वाचनालयात रात्री पांगारकरांचे मोरोपंतांवर व्याख्यान झाले. न्यायाधिश पंडितराव अध्यक्ष होते. गर्दी खूप होती. आपल्या समारोपाच्या भाषणात अध्यक्ष म्हणाले, "विद्यापीठातून बाहेर पडल्यापासून आम्ही जे करावयास पाहिजे होते, ते केले नाही असा पश्चात्ताप मला हे व्याख्यान ऐकल्यापासून झाला आहे." कोल्हापूरच्या समर्थपत्राने एक अग्रलेख लिहून व्याख्यानाचे वेळी श्रोतृसमाज कसा नागासारखा दोन तास डोलत होता व प्रसंगोपात निघालेल्या शेकडो आर्या व त्यांचे स्पष्टीकरण ऐकून कसा तन्मय झाला होता याचे रसभरीत वर्णन केले होते.

पाठांतराचा प्रभाव हा असा आहे. वक्तृत्वस्पर्धेत भाग घेणारे विद्यार्थी आपली भाषणे पाठ करून म्हणतात, याबद्दल कित्येक परीक्षक नाक मुरडतात. याचे मुख्य कारण असे आहे की आपण पाठ केलेले भाषण पाठ केलेले नाही, अशा रीतीने करणे हीदेखील एक कला आहे. ती त्यांना साधत नाही. चर्चिल एवढे नाणावलेले वक्ते, परंतु पार्लमेंटमध्ये महत्त्वाच्या प्रसंगी करावयाचे भाषण ते आधी आठदहा वेळा लिहून काढीत व तोंडपाठ करीत व आपण उत्स्फूर्त भाषण करीत आहोत असा आभास निर्माण करीत. व्हिक्टोरिया राणीचा मुख्य प्रधान ग्लॅडस्टन हा देखील याच तंत्राचा उपयोग करीत असे.

## इसापचरित्र - ७

# झांथस हरला! इसाप जिंकला!

: पु. रा. बेहेरे :

झांथसकडे त्याची बायको परत आली त्यामुळे खूष होऊन त्याने आपल्या विद्यार्थ्यांना मेजवानी देण्याचे ठरवले. मग तो इसापला म्हणाला, 'इसाप, मी माझ्या मित्रांना मेजवानी देणार आहे. तेव्हा सगळ्यांत उत्कृष्ट वस्तू आण आणि त्याचे पक्वान्न कर.' इसाप मनात म्हणाला, 'असले मूर्खपणाचे हुकूम सोडू नयेत अशी अद्दल आता झांथसला घडवली पाहिजे.' मग तो खाटकाच्या दुकानात गेला आणि त्या दिवशी कापलेल्या सगळ्या डुकरांच्या जिभा त्याने विकत घेतल्या. घरी येऊन सगळी पक्वान्ने या जिभांचीच बनवायची असे त्याने ठरवले. त्याने काही जिभा उकडल्या, काही जिभा भाजल्या, काही जिभा तळून काढल्यात आणि त्यांत मसाले घातले. अशा तऱ्हेने त्याने भोजनाची तयारी केली. ठरलेल्या वेळी झांथसचे पाहुणे मेजवानीसाठी आले.

झांथस म्हणाला, 'इसाप, या सर्वांना प्रथम काही तरी खायला घेऊन ये.' इसापने उकडलेल्या जिभा आणि गरम तोंडी लावणे असे प्रत्येकाला आणून दिले. त्या उकडलेल्या जिभा पाहून विद्यार्थी म्हणाले, 'वा! झांथससाहेब, तुमच्या मेजवानीतही तत्त्वज्ञान भरलेले आहे. पद्धतशीरपणे ठरवल्याशिवाय तुम्ही कोणतीच गोष्ट करीत नाही. आता आपल्या मेजवानीची सुरुवातच जिभांपासून झाली!' त्यानंतर त्यांनी पेये घेण्यास सुरुवात केली. काही वेळ मद्यप्राशन झाल्यावर झांथस म्हणाला, 'इसाप, या मंडळींना खाण्यासाठी काही तरी घेऊन ये.' पुन्हा इसापने भाजलेल्या जिभा मीठमिरची लावून प्रत्येकापुढे खाण्यासाठी आणून ठेवल्या! त्या पाहून विद्यार्थी ओरडले, 'वा; वा;! प्रोफेसर-साहेब, कमाल! देवाशपथ कमाल! प्रत्येक जीभ अगदी भाजून काढून तिला व्यवस्थित मीठमिरची लावलेली आहे. तोंडात टाकली की चटका बसतो!' आणि मग ते पुन्हा मद्य पिऊ लागले.

काही वेळाने झांथसने पुन्हा इसापला म्हटले, 'इसाप, आणखी काही तरी खायला घेऊन ये.' इसापने तळलेल्या आणि मसाला घातलेल्या जिभा बशी भरून भरून प्रत्येकापुढे आणून ठेवल्या. त्या जिभा पाहून एक विद्यार्थी म्हणाला, 'या जिभा खाऊन आता माझी जीभ अगदी बाद झाली आहे.' दुसरा विद्यार्थी म्हणाला, 'माझी तर जीभ कोरडी पडू लागली आहे. जिभां-शिवाय येथे खाण्यासारखे दुसरे काहीच नाही काय? या इसापने हात लावला की, त्या कामाचे शेवटी असेच वाटोळे होणार!' ते विद्यार्थी तसेच त्या जिभा खाण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्यांना त्या जिभा पाहूनच इतकी शिसारी आली की, त्यांचा हातच तोंडाकडे जाईना! ते कंटाळले हे पाहून झांथस म्हणाला, 'इसाप, आता आम्हांला रस्सा किंवा सूप आणून वाढ.' इसापने त्यांना जिभा घालून बनवलेला रस्सा आणून वाढला. हे पाहून झांथस ओरडला, 'इसाप, याच्याशिवाय दुसरे काहीच नाही का?' इसाप शांतपणे म्हणाला, 'नाही, मालक! दुसरे काहीही नाही.'

झांथसने विचारले, 'काय? दुसरे काहीही नाही? हलकट्या, मी तुला काय सांगितले होते? जे अगदी उत्कृष्ट, सगळ्यांत उत्कृष्ट वस्तू आण असे मी तुला सांगितले होते की नाही?'

इसाप उत्तरला, 'मालक, तुम्ही या सगळ्या विद्वान लोकांच्या-देखत मला दोष देऊन विचारलेत हे फार बरे झाले. तुम्ही मला सांगितले होते की, जी सर्वांत उत्कृष्ट वस्तू असेल ती घेऊन ये. आता सांगा, की जिभेपेक्षा उत्कृष्ट वस्तू शोधून तरी सापडेल का? सगळे तत्त्वज्ञान, सगळे शिक्षण हे केवळ जिभेवर अवलंबून आहे. जीभ नाही म्हणजे देणे, घेणे, विचारणे, सांगणे, विकणे, विकत घेणे–सगळेच बोलणे खुंटले! केवळ जिभेच्या जोरावर राज्ये सुधारता येतात, हुकूम काढले जातात आणि कायदे बनवले जातात. सगळे जीवनच मुळी जिभेवर अवलंबून आहे; तर जिभे-पेक्षा उत्कृष्ट असे काय असू शकेल?'

विद्यार्थी म्हणाले, 'बरोबर आहे. इसाप म्हणाला, त्यात काही चूक दिसत नाही. प्रोफेसरसाहेब, तुमचीच चूक आहे. तुम्ही त्याला नीट हुकूम दिला नाही.' मग ते सगळे घरी गेले. रात्रभर त्यांना अपचनाचा त्रास झाला आणि हगवण लागली.

दुसऱ्या दिवशी या विद्यार्थ्यांनी झांथसला चांगलेच धारेवर धरले. तेव्हा झांथस त्यांना गयावया करून म्हणाला, 'मित्रांनो, तुम्हांला खरेच सांगतो, काल जे घडले त्यात माझी काहीही चूक नव्हती. त्या नालायक गुलामाचाच तो हलकटपणा होता. पण काल झाले ते झाले. उद्या मी तुम्हांला पुन्हा मेजवानी देतो आणि यावेळी मी तुमच्यादेखतच त्या गुलामाला मेजवानीचे हुकूम देतो.' झांथसने तेथेच इसापला बोलावून आणले आणि सर्वांच्यादेखत त्याला म्हटले, 'इसाप, माझे शब्द माझ्यावर उलटवण्याची तुझी धडपड असते ना? ठीक आहे. उद्या बाजारात जा आणि सगळ्यांत निकृष्ट आणि निरुपयोगी वस्तू विकत आण आणि आमच्या मेजवानीची तयारी कर.'

इसापने हे शांतपणे ऐकून घेतले. दुसऱ्या दिवशी तो पुन्हा बाजारातील त्याच खाटकाकडे गेला आणि त्या दिवशी मारलेल्या



सगळ्या डुकरांच्या जिभा कापून विकत घेऊन आला. मग घरी येऊन आदल्या दिवशीसारखेच त्याने जिभेचे निरनिराळे पदार्थ तयार केले आणि तो झांथसच्या पाहुण्यांची वाट पाहात बसला. थोड्या वेळाने झांथस आणि त्याचे पाहुणे आले आणि जेवणाच्या टेबलाभोवती बसून त्यांनी मद्यपान सुरू केले. काही वेळाने झांथस म्हणाला, 'इसाप, आम्हांला काहीतरी खायला आणून दे.' इसापने त्यांना खारवलेल्या जिभा आणि गरम गरम तोंडी लावणे आणून दिले. विद्यार्थी एकदम ओरडले, 'काय? पुन्हा जिभाच?' झांथस तर एकदम पांढरा फटफटीत पडला. पण एक विद्यार्थी म्हणाला, 'या खारवलेल्या जिभा काही वाईट लागत नाहीत. कदाचित् त्या कालच्या अपचनानंतर पोटाला या जिभा चांगल्याही ठरतील!' त्या जिभाच खाऊन पाहुण्यांनी पुन्हा मद्यपान सुरू केले. काही वेळाने झांथस म्हणाला, 'इसाप, आम्हांला काही तरी खाण्याचे आण.' इसापने त्या सर्वांना चांगल्या भाजलेल्या जिभा आणून वाढल्या. त्या पाहाताच विद्यार्थी ओरडले, 'अरे, पुन्हा याच्या जिभा सुरू झाल्या. आता हा आम्हांला पुन्हा अपचन करवून आमचा जीव घेणार!'

झांथस ओरडला, 'काय? पुन्हा जिभाच? काय रे हल-क्या? बोल, का पुन्हा या जिभा विकत आणल्यास? मी तुला काय सांगितले होते? बाजारात जा आणि सगळ्यांत निरुपयोगी आणि निकृष्ट वस्तू विकत आण, असे सांगितले होते की नाही?'

इसाप उत्तरला, 'खरे आहे. पण अशी कोणती घाणेरडी गोष्ट आहे की, जी जिभेकडून बाहेर येत नाही? सगळ्या वाईट गोष्टींचे मूळ जिभेतच आहे. जिभेमुळे शत्रुत्व निर्माण होते, जिभेने कारस्थाने रचली जातात. वाद, स्पर्धा, यादवी युद्ध सगळे काही जिभेकडूनच होते. जिभेइतकी निकृष्ट आणि निरुपयोगी वस्तू शोधून सापडणार नाही.'

इसापचे हे बोलणे ऐकून एक विद्यार्थी चिडून म्हणाला, 'प्रोफेसरसाहेब, तुम्ही या गुलामाच्या बोलण्याकडे लक्ष देऊ लागलात तर तुमचे डोके फिरून जाईल! जसे याचे शरीर, तशीच याची अक्कल! हा तोंडाळ आणि दुष्ट गुलाम खरोखर कवडीकिमतीचाही नाही.'

इसापने त्याला म्हटले, 'सद्गृहस्था, तू गप्प का बसत नाहीस? मला तर तूच अधिक दुष्ट दिसतोस. तुझ्याकडे झांथसची विद्वत्ता तर काहीच नाही; पण माझ्या मालकाला माझ्याविरुद्ध चिथावणी मात्र तू देत आहेस. सरळ माणूस असा कधी वागत नाही. लुबरा आणि दुसऱ्याच्या कामात लुडबुडणाराच असा वागतो.'

इसापला ठोकून काढण्यासाठी झांथस निमित्तच शोधीत होता. तो म्हणाला, 'इसाप, आता मला माझ्या गुलामाबरोबरही तात्त्विक चर्चा केली पाहिजे. बोल, तू या माझ्या मित्राला लुबरा

आणि दुसऱ्याच्या कामात लुडबुडणारा का म्हणालास? तो लुबरा आणि लुडबुड्या आहे हे सिद्ध कर.'

इसाप उत्तरला, 'हा गृहस्थ लुबरा आणि लुडबुड्या आहेच. दुसऱ्याच्या खर्चाने खाऊन पिऊन मजा मारणारे पुष्कळच असतात; पण त्यांतले काही लोकच दुसऱ्याच्या उठाठेवी करतात. काही लोक असेही असतात की, जे दुसऱ्याच्या भानगडीत न पडता स्वतःच्या सुखदुःखाचा विचार करतात.'

झांथस म्हणाला, 'अस्से काय? ठीक आहे! लुबरी आणि लुडबुडी नाहीत अशी माणसे असतात ना? आता मी तुला सांगतो. उद्या स्वयंपाकाचे काम तुझ्याकडे नाही. तू गावात जा आणि जो लुबरा आणि लुडबुड्या नाही अशा कोणाही एका माणसाला भोजनाचे निमंत्रण देऊन माझ्याकडे घेऊन ये. पण इथे वागताना जर तो लुबरा आणि लुडबुड्या आहे असे दिसून आले तर त्याच्या पहिल्या लुबरेपणाला मी काही करणार नाही; त्याने दुसऱ्यावेळी लुबरेपणा केला तरी मी तुला माफ करीन. पण तिसऱ्या वेळी मात्र मी तुला ठोकून काढल्याशिवाय रहाणार नाही. सगळ्या मित्रांच्यादेखत मी हे तुला सांगतो.'

झांथसच्या सांगण्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी इसाप, लुबरा आणि लुडबुड्या नसलेल्या माणसाच्या शोधासाठी गावात निघाला. वाटेत एका ठिकाणी मोठी मारामारी चालली होती आणि शेकडो लोक भोवती जमून ती मारामारी पाहात होते. पण तेथेच दुसऱ्या बाजूला एक माणूस शांतपणे पुस्तक वाचीत बसला होता. त्याला या मारामारीची जशीकाही दादच नव्हती. त्याला पाहून इसापला वाटले की, हा माणूस लुबरा आणि लुडबुड्या दिसत नाही. याला जेवायला बोलावले तर आपला मार चुकेल. म्हणून इसाप त्या माणसाकडे जाऊन म्हणाला, 'अहो सद्गृहस्थ, तत्त्वज्ञ झांथस यांनी तुमच्या सज्जनपणाची कीर्ती ऐकून तुम्हांला आज आपल्याकडे मेजवानीचे निमंत्रण दिले आहे.'

तो माणूस म्हणाला, 'मी जरूर येतो. तुम्ही चला. झांथसच्या पुढच्या दाराशी येऊन मी उभा राहीन.'

इसाप घरी आला आणि जेवणाची तयारी करू लागला. तेव्हा झांथसने विचारले, 'इसाप, तुझा तो माणूस कुठे आहे?' इसाप म्हणाला, 'पुढल्या दरवाजात उभा राहीन, असे त्याने सांगितले आहे.' थोड्या वेळाने तो माणूस पुढच्या दरवाजात आला. झांथसने त्याला आपल्या मित्रांबरोबर बसवले आणि मधाळ मद्य आणून प्रथम या नव्या पाहुण्याला देण्यास सांगितले. त्याबरोबर हा नवा पाहुणा म्हणाला, 'छेः छेः छेः! असे कसे होईल? प्रथम तुम्ही मद्य घेतले पाहिजे, नंतर तुमच्या बाईसाहेब घेतील आणि त्यानंतर आम्ही तुमचे मित्र मद्य घेऊ.'

पाहुण्याचे हे शब्द ऐकताच झांथसने इसापकडे पाहून मान डोलावली. आपल्या पाहुण्याने लुबरेपणा आणि लुडबूड केली; एक वेळ झाली हा झांथसच्या मान डोलावण्याचा अर्थ इसापला समजला. त्यानंतर माशांचा रस्सा गुलामाने आणून सर्वांना दिला. झांथसला काहीतरी निमित्तच हवे होते. तो एकदम त्या गुलामावर भडकला.



तो ओरडला, 'अरे चोरा, तुला सगळे जिन्नस व्यवस्थित दिले होते तरी हा असला रस्सा बनवलास काय ? माझ्या पाहुण्यांचा अपमान करतोस ? या रश्यात मसाला नाही, तेल नाही. सगळा रस्सा बिघडवून टाकला. कुठे आहे तो स्वयंपाकी ? त्याला फटकेच मारले पाहिजेत !' झांथस असा भडकताच पाहुणा त्याला थांबवून म्हणाला, 'नाही मालक ! या रश्यात सगळ्या वस्तू व्यवस्थित आहेत. रस्सा मोठा छान झाला आहे !' झांथसने पुन्हा इसापकडे पाहून मान डोलावली. तुम्या पाहुण्याने दोन वेळा लुबरेपणा आणि लुडबूड केली असे त्याने आपल्याला सुचवले हे इसापने ओळखले. थोड्या वेळाने केक आणून वाढण्यात आले. ते केक पाहाताच झांथस ओरडला, 'कोणी हे केक बनवले ? बोलावा त्याला इकडे. या केकमध्ये मध नाही, काही नाही.'

पुन्हा तो पाहुणा लुडबुडला, 'केक अगदी उत्तमच आहेत. तुमच्या या मेजवानीत नाव ठेवण्यासारखे काही नाही. तुम्ही तुमच्या गुलामांना निष्कारण मारू नका.' हे ऐकताच झांथसने पुन्हा इसापकडे पाहून मान डोलावली आणि म्हटले, 'ही तिसरी वेळ झाली.' इसाप तावडतोब उत्तरला, 'मालक, मी हरलो !'

मेजवानी संपल्यानंतर पाहुणे निघून गेले. मग झांथसने इसापचे हातपाय बांधून त्याला उभा केला आणि त्याला काठीने चांगला चोपून काढला. मग झांथस त्याला म्हणाला, 'ही तुझी आजची बक्षिसी झाली. लुबरा आणि लुडबुडा नसलेला माणूस शोधून आणून तू उद्या माझ्यासमोर उभा कर. नाहीतर उद्या पुन्हा तुझी हाडे मी नरम केल्याशिवाय रहाणार नाही.'

दुसऱ्या दिवशी इसाप सरळ माणसाच्या शोधार्थ निघाला आणि शहराच्या बाहेर गेला. तो माणसे पाहात चालला होता. इतक्यात त्याला खेडवळ आणि ओबडधोबड चेहऱ्याचा एक माणूस दिसला; पण त्याची चालचलणूक सभ्यपणाची असावी असे इसापला वाटले. तो माणूस एका गाढवावर लाकडे लादून चालला होता. माणसांची गर्दी टाळून तो बाजूबाजूने जात होता आणि चालता चालता आपल्या गाढवाशीच बोलत होता. आपण बरे की आपले काम बरे अशा तऱ्हेचा हा माणूस असावा असे वाटून इसाप त्याच्या मागून चालू लागला.

तो खेडवळ माणूस आपल्या गाढवाशी बोलत होता. तो म्हणत होता, 'लवकर चल बाबा ! आपण लवकर गेलो तर आपली लाकडे विकून आपल्याला बारा आणे तरी मिळतील. मग त्यांतले दोन आणे तुझ्या गवतासाठी आहेत तेही तुला लवकर मिळतील. दोन आण्यांत मी माझे पोट भागवीन आणि आठ आणे राखून ठेवीन. उद्या आपण आजारी पडलो किंवा आणखी काही अडचण येऊन आपल्याला लाकडे मिळाली नाहीत, तर आपल्यावर उपाशी राहण्याची पाळी यायला नको.' इसापने त्याचे हे बोलणे ऐकले आणि तो स्वतःशी विचार करू लागला की, देवाशपथ हा माणूस लुबरा आणि लुडबुडा असावा असे वाटत नाही. तेव्हा यालाच निमंत्रण द्यावे असे ठरवून इसाप त्याच्याजवळ गेला आणि त्याला नमस्कार करून म्हणाला, 'राम राम, दादा.' त्या खेडवळानेही त्याला राम राम केला. तेव्हा इसापने विचारले, 'तुमच्या या लाकडांची किंमत काय ?' खेडवळ म्हणाला, 'बारा आणे !' इसाप विचार करू लागला की, हा प्रामाणिक माणूस दिसतो. मघाशी हा गाढवाबरोबर बोलताना जेवढी किंमत बोलला, तेवढीच आताही सांगतो आहे. मग इसाप त्या खेडवळाला म्हणाला, 'काय दादा, तुम्ही तत्त्वज्ञानी झांथसला ओळखता का ?' खेडवळ उत्तरला, 'नाही बुवा !' इसाप म्हणाला, 'आश्चर्य आहे. तुम्ही त्याला कसे ओळखत नाही ?' खेडवळाने उत्तर दिले, 'मी निष्कारण लुडबूड करणारा नाही. म्हणून त्याला ओळखत नाही. त्याचे नाव मात्र मी ऐकले आहे.' इसाप म्हणाला, 'हां. तर त्या झांथसचा मी गुलाम आहे.' त्यावर त्या खेडवळाने म्हटले, 'तू त्याचा गुलाम आहेस, की आणखी कोणाचा गुलाम आहेस, की स्वतंत्र नागरिक आहेस हे मी तुला विचारले होते का ? मला त्याच्याशी काय करायचे आहे ?'



इसापच्या मनात आले हाच खरा लुडबुड्या आणि लुबरा नसलेला माणूस आहे. मग तो त्या खेडवळाला म्हणाला, 'दादा, तुमची ही लाकडे मी विकत घेतो. तुम्ही तुमचं गाढव झांथसच्या घराकडे वळवा.' खेडवळ उत्तरला, 'पण झांथसचे घर मला ठाऊक नाही.' इसाप म्हणाला, 'तुम्ही माझ्या मागून या.' असे म्हणून तो त्या खेडवळाला झांथसच्या घरी घेऊन आला. त्याची लाकडे घेऊन इसापने त्याला पैसे देऊन टाकले. मग तो त्या खेडवळाला म्हणाला,

दादा, आमचा मालक म्हणतो तुम्ही आज त्यांच्याबरोबर जेवून मगच जा. तेव्हा तुम्ही घरात चला आणि तुमचे गाढव मागच्या दारीच राहू दे. त्याला आम्ही गवतपाणी घालतो.' तो खेडवळ माणूस सरळ घरात गेला. मला कशाला जेवायला बोलवता असे काहीही त्याने विचारले नाही. त्याच्या पायांतले जोडे चिखला-मातीने भरले होते. तसाच तो आत आला. तेव्हा त्याला पाहाताच झांथसने विचारले, 'काय इसाप, हा तसा आहे की मला हवा तसा आहे?' इसापने उत्तर दिले, 'मालक, काळजी करू नका. हा अगदी मला हवा तसा आहे.'

इसापचे हे उत्तर ऐकून झांथसने आपल्या बायकोला हाक मारून विचारले, 'तुला इसापची फजिती बघायची आहे ना? मग इकडे ये. आज मी त्याची हाडे नरम करणार!' झांथसची बायको उत्तरली, 'मी तर त्याची वाटच बघते आहे!' झांथस म्हणाला, 'होय ना? मग आता मी एक गंमत करतो. तू पाणी, थाळी घेऊन जा आणि त्या खेडवळ पाहुण्याचे पाय धुवायला सुरुवात कर. तू घराची मालकीण आहेस हे तुझ्याकडे पाहूनच तो ओळखील आणि मग तुला आपले पाय धुवू देणार नाही. तो म्हणेल, 'मालकीणबाई, तुम्ही कशाला असले काम करता? तुमचा एखादा गुलामसुद्धा माझे पाय धुऊ शकेल.' तो असे लुबरेपणाने म्हणाला की, इसापची शंभर वर्षे भरलीच म्हणून समज.'

झांथसच्या बायकोला इसापचा अतिशय द्वेष वाटत असे. तेव्हा इसापला मार मिळणार हे पाहून ती मोठ्या आनंदाने त्या खेडवळाचे पाय धुण्यास तयार झाली. पाणी आणि थाळी घेऊन ती खेडवळापुढे गेली आणि म्हणाली, 'महाशय, मी तुमचे पाय धुऊ का?' तो खेडवळ माणूस मनात म्हणाला, 'झांथस हा तत्त्वज्ञानी आहे. माझे पाय धुण्याचे काम त्याला गुलामाला सांगता आले असते. पण त्याची तशी इच्छा दिसत नाही. पण त्याने आपल्या बायकोला माझे पाय धुण्यास सांगितले त्यावरून माझा सन्मान करण्याची त्याची इच्छा दिसते. त्याची इच्छा असली तर तो करीना माझा सन्मान! मी मधे लुबरेपणा करून त्याला कशासाठी अडवू? ती पाय धुणार असेल तर मी पाय पुढे करीन.' त्या खेडवळाने झांथसच्या बायकोपुढे पाय केले आणि खुर्चीत रेलून तो ऐसपैस बसला. झांथसच्या बायकोला त्या खेडवळाचे पाय धुण्याखेरीज गत्यंतरच नव्हते. झांथस आणि त्याची बायको दोघेही खजील झालीत. पण आपला पराभव होईल असे झांथसला वाटत नव्हते.

त्याने गुलामाला हाक मारली आणि मधाळ मद्य आणून पाहुण्याला देण्यास सांगितले. खेडवळ माणूस मनात म्हणाला, 'झांथस यजमान आहे. म्हणून प्रथम त्यानेच मद्य घ्यायला पाहिजे. पण त्याऐवजी तो मला देत आहे. देईना, आपला गौरव करण्याची त्याची इच्छा असेल. आपण कशाला लुडबूड करा!' गुलामाने मद्याचा प्याला आणून देताच त्या खेडवळाने तो घेतला आणि सावकाश सावकाश तो पिऊ लागला. झांथस चपापला. पण त्याचा धीर सुटला नाही. त्याने जेवण वाढण्यास फर्मावले. गुलामाने जेवणे वाढलीत. 'सुरुवात करा' असे झांथसने सांगताच खेडवळ भराभर जेवू लागला. हा माणूस काहीच बोलत नाही, असे पाहून झांथस अधिकच अस्वस्थ झाला. मग त्याने जेवणाची रुची बघितल्यासारखे केले आणि तो एकदम ओरडला, 'इसाप' त्या स्वयंपाक्याला इकडे बोलाव.' स्वयंपाकी येताच झांथस त्याच्या अंगावर खेकसला, 'काय रे बदमाष? तुला मीठ, मिरची, तेल या वस्तू मिळाल्या होत्या की नाही? मग या रश्यात, कढीत तू या वस्तू का घातल्या नाहीस? मासे नीट का तळले नाहीस? इसाप, याला बांधून काढ आणि फटके मार.'

आता तरी हा खेडवळ त्या स्वयंपाक्याची बाजू घेऊन काही तरी बोलेल, असे झांथसला वाटत होते. पण तो खेडवळ तिकडे लक्ष न देता सावकाश जेवत राहिला. तो मनात म्हणाला, 'जेवणाचे सगळे पदार्थ चांगले रुचकर झाले आहेत. त्यांत सगळ्या वस्तू व्यवस्थित घातलेल्या दिसताहेत. तरीही हा झांथस आपल्या स्वयंपाक्यावर भडकून त्याला मारणार असेल तर मारीना. त्यांच्या भानगडीत पडून आपल्याला काय करायचे आहे?'

झांथसच्या हुकूमाप्रमाणे त्या स्वयंपाक्याला इसाप फटके मारू लागला, तरीही तो खेडवळ तिकडे लक्ष न देता खुशाल जेवत बसला. झांथस मनात म्हणाला, 'हा माणूस बहिरा आणि मुका आहे की काय कळत नाही. हा मुळी बोलतच नाही. आता याला काय करावे?' जेवणे आटोपलीत. आणि सर्वांना केक देण्यात आले. खेडवळाला घरी केक कुठे मिळत होता? तो आपला केक खाऊ लागला. आता झांथसचा धीर सुटला. या खेडवळाने लुबरेपणा केला नाही तर इसाप जिंकणार हे स्पष्ट दिसत होते. झांथसने केक खाल्ल्यासारखा केला आणि तो एकदम ओरडला, 'त्या केक बनविणाऱ्याला इकडे आणा.' तो आला तेव्हा झांथस त्याला म्हणाला, 'काय रे चोरा, या केकमध्ये मध, लोणी का घातले नाहीस? आणि हा आंबट का लागतो?' केक बनविणारा म्हणाला, 'मालक, केक नीट भाजला नसेल आणि कच्चा असेल तर मला बोला; पण त्यात मध, लोणी नसेल तर त्याला माझा काय इलाज? मी बाईसाहेबांकडे केकमध्ये घालण्यासाठी मध आणि लोणी मागितले तर त्या म्हणाल्या, 'मी आंघोळ करून येते आणि मग मध आणि लोणी देते.' पण त्या आंघोळीहून वेळेवर आल्याच नाहीत. उशीर होऊ नये म्हणून मी तसाच केक भाजत ठेवला. त्यामुळे तो आंबट लागत असेल तर त्याला बाईसाहेब कारण आहेत.'

झांथस म्हणाला, 'असे काय? हा माझ्या बायकोच्या निष्काळजीपणाचा परिणाम असेल तर तिला मी जिवंत जाळीन.' मग बायकोकडे पाहात अन् डोळे मिचकावून तो हळूच म्हणाला, 'आता तुझी पाळी आली!' मग इसापकडे वळून तो म्हणाला, 'इसाप जा, लाकडे आणून रच आणि या बाईला जाळण्यासाठी चिता तयार कर.'

इसापने मागल्या दारी लाकडे रचून मोठी चिता तयार केली. झांथसने आपल्या बायकोला ओढीत नेऊन त्या चितेवर ढकलले.

# घड्याळबाबा

घड्याळबाबा भिंतीवर बसतात
दिवसभर टिक्-टिक् करतात
टण्-टण् ठोके देतात
आणि सांगतात—
मुलांनो, सहा वाजले
आता उठा.
मुलांनो, आठ वाजले
आता आंघोळ करा.
मुलांनो, दहा वाजले
आता जेवायला बसा.
अकरा वाजले, शाळेत जा.
आम्ही रोज घड्याळबाबांचे ऐकतो.
पण रविवारी मात्र ऐकत नाही.
ते म्हणतात, सहा वाजले, उठा,
आम्ही सात वाजता उठतो.
ते म्हणतात, आठ वाजले, आंघोळ करा,
आम्ही नऊ वाजता आंघोळ करतो.
ते म्हणतात, दहा वाजले, जेवायला बसा.
आम्ही अकरा वाजता जेवायला बसतो
आणि रविवारी शाळेला तर
सुटीच असते.
घड्याळबाबा खूप चिडतात,
जोराजोराने टिक् टिक् करतात,
रागारागाने टण् टण् ठोके वाजवतात,
पण रविवारी आम्ही त्यांच्याकडे
पाहातच नाही.
पाहिले तर नुसते हसतो
आणि खेळत राहतो.



—कुसुमाग्रज

ती ओरडू लागली तरी झांयस तिला आढतच होता. आता तरी तो खेडवळ माणूस काही बोलेल आणि त्याला अडवील असे झांयसला वाटत होते.

तो खेडवळ शांतपणे मद्याचे घुटके घेत बसला होता. झांयस आपली कसोटी पाहातो आहे हे त्याने ओळखले. मग तो उठला आणि झांयसला म्हणाला, 'प्रोफेसरसाहेब, तुम्ही हिला खरोखरच जिवंत जाळणार असलात तर जरा थांबा. मी घरी जाऊन माझ्या बायकोला घेऊन येतो. हिच्याबरोबर तिलाही जाळून टाका!' आणि झांयसचे उत्तर ऐकण्यासाठी न थांबता तो खेडवळ आपले गाढव घेऊन निघून गेला.

त्या खेडवळाचा थंडपणा पाहून झांयस सर्दच झाला. तो इसापला म्हणाला, 'इसाप, तू म्हणालास तसा माणूस आणलास. मी हरलो, तू जिंकलास. आता या तुझ्या युक्त्या पुरे कर. आणि माझी नोकरी नीटपणे कर. काय?'

झांयसने हरल्याचे कबूल केल्यामुळे इसापला बरे वाटले. तो म्हणाला, 'मालक, तुम्ही काही काळजी करू नका. इमानी चाकर कसा वागतो, हेच तुम्ही यापुढे पाहा. मी तुमचा इमानी गुलाम आहे.'

झांयस हरला! इसाप जिंकला!

# काही बडबड गीते

## पावसाचे गाणे

देवा पाऊस पडू दे
आज शाळा बुडू दे !
दारात पाणी साचू दे
खूप मला नाचू दे !

फिरून पाऊस येऊ दे
कपडे ओले होऊ दे !
शिंक, खोकला येऊ दे,
आई औषध देऊ दे !





## काळोख

आई जरा जवळ ये
मला वाटते भीती
अबब अबब
काळोख काळा किती !

आई जरा अंगावर
टाक तुझा हात—
मग मुळीच नाही मी
भिणार काळोखात !



## खाऊचे गाणे

सांगायचे नाही, बोलायचे नाही
अळी मिळी चूप
आज घरात बाबांनी
खाऊ आणलाय खूप !

अधी मधी उगीच कुणी
बोलेल तो वेडा
मिळणार नाही बरे मग—
काय ?—केशरी पेढा !




## दोरीवरची उडी

दोरीवरची उडी जाते लांब
मला आवडतो समोरचा खांब
दोरीवरची उडी जाते मागे
धाडदिशी दरवाजा लागे
दोरीवरची उडी पायांत अडते
मी पडते !—खूप खूप रडते !

—शान्ता ज. शेळके

# धूर्त पुरोहित

: पंढरीनाथ रेगे :

जाधोजी भट्ट हा ब्राम्हण सुरेंद्रनगरच्या राजघराण्याचा जुना पुरोहित होता. तो अतिशय विद्वान, तसाच विविध कलांत पारंगत होता. नव्वदी गाठून तो खूप म्हातारा झाला तेव्हा राजघराण्यातील आपले पौरोहित्य त्याने आपला पुतण्या वल्लभजी याच्याकडे सोपवले. तरीपण राजघराण्यातील—राजवाड्यातील घडामोडीत अजूनही तो रस घेत असे. राजवाड्यात कायकाय चालते, कोण काय विशेष बोलते याची चौकशी वल्लभजीकडे तो रोजच्या रोज करीत असे. प्रत्यक्ष राजवाड्यात तो वर्षातून एकदाच, फक्त पाडव्याच्या दिवशी जात असे आणि त्यावेळी मिळणाऱ्या देणग्या घेऊन येत असे.

अर्जनसिंग व सबळसिंग हे दोघे भाऊ यावेळी जोडीने सुरेंद्र-नगराचा राज्यकारभार पाहात होते. तर, त्यांच्यांत काही मतभेद झाले आणि राज्याची वाटणी करण्याचे त्यांनी योजले आहे, अशी वार्ता वल्लभजीने एके दिवशी राजवाड्यातून परतताच चुलत्याला सांगितली. वल्लभजी म्हणाला, "सुरेंद्रनगर कोणाच्या वाटणीला येतं ते पाहायचं ! कारण, दोघाही भावांना तेच हवंय असं दिसतं."

ही वार्ता ऐकून वृद्ध जाधोजी भट्ट चिंतेत पडला. वडिलकीच्या न्यायानुसार थोरला भाऊ अर्जनसिंग यालाच सुरेंद्रनगर मिळायला हवे, धाकट्या भावाच्या वाट्याला चुडा हा भाग जावा असे त्याचे मत होते. या बाबतीत उभयतात तडजोड कशी काय करता येईल, याचा विचार करीत करीतच दुसऱ्या दिवशी सकाळी जाधोजी राजवाड्यावर गेला.

वृद्ध जाधोजी अचानक आलेला पाहून सर्वांना आश्चर्य वाटले. पण तो शांतपणे, दोघेही राजपुत्र जिथे बोलत बसले होते त्या दिवाणखान्यात गेला. त्याला पाहून अर्जनसिंग बोलला,

"ओ-हो-हो !....पुरोहितजी, आपण इकडं यायचे श्रम कशाला घेतलेत ? नुसता निरोप पाठवला असतात, तरी आम्ही स्वतः येऊन आपणाला भेटलो असतो की !"

"मला राहवलं नाही म्हणून आलो मी." जाधोजी बोलला. "राज्याची वाटणी करण्याचे तुमचे बेत चालले आहेत, असं ऐकलं, म्हणून शुभचिंतन करायला आलोय."

"कुणी कोणता भाग घ्यायचा हे ठरवत आहोत आम्ही." अर्जनसिंग सांगू लागला, "पण....त्या बाबतीत आमच्यात मतभेद झाले आहेत. माझं म्हणणं असं की, मी वडील भाऊ म्हणून निवड करण्याचा पहिला हक्क माझा. पण याला–सबळसिंगाला वाटतं– की धाकटा असल्यानं निवडीचा पहिला हक्क त्याला मिळावा. तुम्हीच आमचा वाद सोडवा ना !"

"हो, पुरोहितजी. तुम्ही आमच्या घराण्याचे जुने-जाणते पुरोहित. आमचे हितचिंतक. तेव्हा तुम्हीच काय तो निवाडा करा झालं !" सबळसिंगाने दुजोरा दिला.

जाधोजी हा व्यवहारात मुरलेला धूर्त, मुत्सद्दी होता. तो साळसूदपणे म्हणाला, "महाराज, निवाडा करण्याचं काम मला करायला सांगू नका. तुम्ही दोघेही भाऊ मला सारखे. शिवाय, तुमच्या या राजकीय घडामोडीत माझ्यासारख्या ब्राम्हणानं पडू नये हे बरं ! आम्ही आपले धार्मिक कार्यात—प्रार्थनेत गढलेले."

"म्हणूनच तर तुम्ही आमचा निवाडा करायचा. तुमचा निवाडा आम्ही मान्य करू. तुमच्यावर आमची श्रद्धा आहे." दोघेही राजपुत्र आग्रहाने बोलले.

"आधी तुम्हांला मी एक गोष्ट सांगतो, ती शांतपणे, लक्ष देऊन ऐका." जाधोजी सांगू लागला, "पूर्वीच्या काळी एक ऋषी होता नि त्याचे दोन शिष्य होते. बारा वर्षे–एक तप त्यांनी त्या ऋषीकडं राहून अध्ययन केलं. आपलं सारं ज्ञान त्या ऋषीनं आपल्या या शिष्यांना दिलं. अध्ययन संपल्यावर शिष्यांनी आपापल्या घरी जायची तयारी केली. एके रात्री ऋषी यज्ञकुंडापाशी ध्यान करीत बसला असताना, हे दोघेही शिष्य त्याचा निरोपाचा आशीर्वाद घ्यायला त्याच्याकडं गेले. ऋषीनं यज्ञकुंडातली थोडी रक्षा हातात घेतली आणि ती थोडी थोडी दोघांच्या हातावर ठेवली. गुरूनं प्रसाद म्हणून दिलेली ती पवित्र विभूत आहे, अशा भावनेनं एका शिष्यानं आपल्या हातावरची रक्षा तोंडात टाकली आणि मटकावली. तर दुसऱ्यानं ती राख काय करायची म्हणून झटकून टाकून दिली. तर काय झालं, ज्यानं ती रक्षा गिळली तो विद्वान पंडित झाला, आणि गुरूचा प्रसाद टाकून देणारा पुढं अतिशहाणा —पढतमूर्ख गणला गेला. गुरूनं दिलेलं ज्ञान त्यानं पोपटपंची-सारखं स्वीकारलं होतं; त्यामुळं त्या ज्ञानाचा उपयोग त्याला करून घेता आला नाही. आपल्याला चांगलं शिक्षण दिलं नाही म्हणून तो गुरूलाच दोष देऊ लागला."

गोष्ट सांगून झाल्यावर जाधोजी म्हणाला, "तुमच्या या प्रकरणात तुम्ही दोघेही मला सारखेच प्रिय आहात. तेव्हा मी दिलेला निवाडा तुमच्यापैकी ज्याच्या इच्छेविरुद्ध जाईल त्याला तो पसंत पडायचा नाही."

परंतु जाधोजीनेच निवाडा करावा, असा आग्रह दोघाही भावांनी धरला. शेवटी असे ठरले की, दुसऱ्या दिवशी सकाळी जाधोजीने आपला निवाडा द्यावा.

•

घरी परतल्यावर जाधोजी त्याच प्रकरणाचा विचार करीत राहिला. अखेर, सुरेंद्रनगर अर्जनसिंगाला देण्याच्या दृष्टीने कोणती युक्ती लढवता येईल, याचा बेत त्याने आखला आणि मग वल्लभजीमार्फत अर्जनसिंगाला गुपचूप एक चिठ्ठी लिहून त्यांनी सूचना केली, "आज्ञाधारक शिष्यासारखं वाग, म्हणजे सर्व काही ठीक होईल."

दुसऱ्या दिवशी सकाळी जाधोजी ब्राम्हण पुन्हा राजवाड्यावर



गेला. सर्व नोकरचाकरांना बाहेर घालवण्यात आले आणि दिवाण-खान्याची दारेही बंद करण्यात आलीत. आता आत फक्त जाधोजी व दोघे राजपुत्र एवढेच राहिले. मग जाधोजीने शांतपणे विचारले, "काल सांगितलेली दोघा शिष्यांची गोष्ट आठवते ना?"

"हो!" दोघेही भाऊ मान हालवीत उद्‌गारले, "आम्ही तुम्हांला बिलकूल दोष देणार नाही."

त्यानंतर जाधोजीने कागदाचे दोन कपटे घेतले. प्रत्येकावर गुपचूप काहीसे लिहिले. ते कपटे दुमडून त्यांच्या चिठ्ठ्या बनवल्या. मग त्या दोन्ही चिठ्ठ्या समोर ठेवीत जाधोजी म्हणाला,

"यापैकी एका चिठ्ठीवर मी 'सुरेंद्रनगर' हा शब्द लिहिलाय तर दुसरीवर लिहिलंय 'चुडा' ज्या नावाची चिठ्ठी जो उचलील त्याला तो भाग मिळायचा. या दोन भागांखेरीज उरलेल्या बारा गावांची वाटणी मग दोघांत समसमान केली जाईल."

प्रथम अर्जनसिंगाने चिठ्ठी उचलली; आणि "जे काही माझ्या वाट्याला आलंय त्यात मी समाधान मानतो." असे म्हणत त्याने चिठ्ठीचा तो कपटा वाचूनही न बघता, तोंडात टाकून चावून गिळून टाकला.

त्याची ही कृती पाहून सबळसिंगाला नवल वाटले. त्याने विचारले, "काय लिहिलंय ते न पाहाताच तू चिठ्ठी मटकावून कशी टाकलीस ?"

"त्यानं काही बिघडत नाही," अर्जनसिंग हसत बोलला, "तुझी चिठ्ठी तिथं आहेच की! तिच्यावर जे लिहिलं असेल ते तुझं. उरलेलं अर्थातच माझं."

मग सबळसिंगाने दुसरी चिठ्ठी उचलून उलगडून पाहिली. तिच्यावर लिहिले होते, 'चुडा'.

वाटणी झाली होती. निवाडा मुकाट्याने मान्य करून सबळसिंग चुडाला जाऊन राज्यकारभार करू लागला. अर्जनसिंग अर्थातच सुरेंद्रनगरातच राहिला.

धूर्त ब्राम्हणाच्या युक्तीचे रहस्य काही काळानंतर उलगडले. त्याने मुळी दोन्ही चिठ्ठ्यांवर 'चुडा' हाच शब्द लिहिला होता. आणि 'आज्ञाधारक शिष्या'सारखे वागायचे या सूचनेप्रमाणे अर्जनसिंगाने आपली चिठ्ठी मटकावून टाकली होती.

ही गोष्ट सुरेंद्रनगरात सर्वांना ठाऊक झाली आहे आणि ती आठवली की, लोक अजूनही पोट धरधरून हसतात!....



# रामाची सेना

: मीरा निमकर

अलाहाबादला बदली झाली छोट्याच्या बाबांची. अगदी अचानक! आम्ही तयारीला लागलो. यापूर्वीच तिकडे जाऊन राहून आलेल्या मंडळींनी आम्हांला धाक घातला, ' तुम्हांला तिकडे मुळीच करमणार नाही. पुण्या—मुंबईसारखं मोठं शहर नाही ते. आणि तिथले लोकही इकडच्या मानाने जरा मागासलेले आहेत. ' आम्ही सारे मुकाट्याने ऐकून घेत होतो आणि एकीकडे सामान आवरीतच होतो. कारण बदली आली होती तेव्हा जाणे तर भागच होते !

तीस-बत्तीस तासांचा आगगाडीचा प्रवास करून एका सकाळी अलाहाबादला उतरलो आणि आमच्या स्नेह्यांनी अगोदरच आमच्यासाठी भाड्याने घेऊन ठेवलेल्या घरी गेलो. घर आम्हांला सर्वांना, विशेषतः मुलांना खूपच आवडले. छोटा चार-पाच खोल्यांचा बैठा बंगला होता. सबंध घरावर प्रशस्त गच्ची होती. आवारात आंबा, पेरू, सिताफळ ही झाडे होती. खेळायला मोकळे अंगण होते. घराच्या डाव्या हाताला कुणाचीतरी मोठी पेरूची बाग होती आणि उजवीकडे शिंगाड्याच्या लागवडीसाठी पाणी साठवून केलेले छोटेसे तळे होते. बागेच्या राखणदाराकडे कोंबड्या—बदके होती आणि परेड करणाऱ्या सैनिकांच्या थाटात ती रोज तळ्यावर जात ती आमच्या घरासमोरूनच. त्यांचा कलकलाट आणि राखणदाराचा गडगडाट मुलांना खूप आवडू लागला. कारण कुठलाही आवाज, त्यांतल्या त्यात मोठा आवाज, आमच्या मुलांना फार प्रिय होता ! घरासमोर रस्ता, त्यापलीकडे थोडे माळरान आणि त्याच्या पलीकडून रेल्वे मार्ग होता. घराच्या व्हरांड्यातून आले की दहा वेळा आगगाडी जाताना दिसत होती. एरवी कौतुकाने धावधावून पाहाव्या लागणाऱ्या गोष्टी इथे घरबसल्या दिसत होत्या. त्यांमुळे मुले या घरावर फारच खूष झाली होती.

आणि दोन-तीन दिवसांनी तर त्यांच्या या आनंदावर कळस चढला ! रविवार असावा. दुपारची जेवणे करून आम्ही सर्वजण घरात वाचत, लोळत होतो. तेवढ्यात 'लागे........लागे.....लग् .....लग्.....' असा मुलांच्या ओरडण्याचा आणि त्यापाठोपाठ काठ्या आपटल्याचा आवाज़ कानांवर आला. मुले निमित्ताचीच वाट पाहात होती. पटकन बाहेर धावली. "ए आई, माकडं ! माकडं !!

बाबा, लवकर या पाहायला.'' मुलांनी एकच जल्लोष केला. आम्हीही मुलांच्या वरताण उत्साहाने बाहेर धावलो. कारण पुण्या-मुंबईला माकडे ही फक्त बागेतल्या प्राणीसंग्रहालयात, अगर प्रवासात—घाटातल्या झाडांवर पाहाण्याची बाब होती! पेरूच्या बागेवर माकडांचा हल्ला झाला होता.

त्या दिवशी धावत जाऊन तो २५–३० माकडांचा कळप पाहाताना खूप मजा वाटली. पण नवी नवलाई संपली आणि नंतर हा माकडजत्था आमच्या अंगवळणी पडला. नव्हे कधी कधी तर अगदी वैताग आणू लागला. माद्या, बच्ची लहान, मोठी सारी मिळून ३५–४० माकडे तरी एकेका कळपात असत. बहुतेक करून लाल तोंडांची, लांब शेपटीवाली असत आणि सतत खाण्याच्या शोधात असत. आमच्या घराशेजारी पेरूची बाग होती. त्यामुळे माकडांची बहुतेक रोजचीच हजेरी असे. म्होरक्याने साठा काबीज करायचा आणि बाकीच्यांनी ताव मारायचा. खाणे संपले की पोरांचा खेळ सुरू होई आणि मोठी एकमेकांच्या अंगावरचे किडे मारीत बसत. एखादी कपड्याची चिंधी, मोडके खेळणे, जुनी तुटकी चप्पल यांपैकी काहीही मिळाले तरी छोट्या माकडांचा खेळ सुरू होई. त्याची फेकाफेकी आणि त्यामागे धावणे हा खेळ! खूप वेळ खेळात रंगून जात. आपल्या लांब लांब शेपट्या उंच उडवत ती माकडे झाडांवरून इकडून तिकडे उगाचच उड्या मारू लागली, लोंबकाळू लागली की खरेच खूप मजा वाटायची. धावपळीने पुन्हा भूक लागायची! मग मोठ्या मंडळींच्या आसपास घोटाळायचे. पुन्हा सर्वजण पुढच्या हल्ल्यासाठी तयार होऊन उठत.

एक दिवस तर या माकडांनी अशी काही फजिती केली माझी! मी सांजाच्या पोळ्यांचा बेत ठरवला होता. सांजा करून ठेवला. कणीक मळून पातेल्यात झाकून ठेवली अन् मुलांना जेवण्यासाठी हाक मारायला बाहेर गेले. इकडे तिकडे खेळत असलेली मुले हाका मारताच धावत आली. स्टोव्ह पेटवून तवा ठेवला अन् पोळ्या करण्यासाठी कणकेची पातेली पुढे ओढली. परात उचलून पाहाते तो कणकेचा गोळा नाही! मला मोठे आश्चर्य वाटले! मी पुन्हा पुन्हा इकडे तिकडे पाहात होते. मुलांनाही या भुताटकीचे मोठे नवल वाटले. जरा वेळ सारीजणेच अगदी चक्रावल्यासारखी झाली. तेवढ्यात छोटूचे लक्ष खिडकीबाहेर गेले. ''आई, अग माकडांनी नेली कणीक'' तो ओरडला! आम्ही सारीच खिडकीकडे धावलो. पाहिले तो खरेच. दोघेजण मोठ्या चवीने खात बसली होती समोरच्या झाडावर. बेट्यांनी किती बारीक लक्ष ठेवले होते घरावर! मी स्वयंपाकघरातून दोन चार मिनिटांपेक्षा काही जास्त वेळ बाहेर राहिले नव्हते. पण तेवढी संधी साधून बेट्यांनी आपला डाव साधला! बिलकुल आवाज न करता कणकेचा गोळा काढून घेऊन पुन्हा पातेली व्यवस्थित झाकून ठेवली होती. नशीब मुलांचे, म्हणून सांजा कपाटात ठेवला मी! नाहीतर माकडांनी व्यवस्थित मेजवानीच साजरी केली असती!

मोठ्या माकडांच्या हाताखाली छोटीही फार लवकर तयार होत असत. ती खिडकीच्या गजांतून मोठ्या खुबीने घरात शिरकाव करून येत आणि मग करंडीतली भाजी, दोरीवर टांगून ठेवलेली केळी, इकडे तिकडे कुठे ठेवलेला नारळ, काही काही म्हणून जागेवर



ठेवत नसत ! सारे मर्कटाय स्वाहा ! पण छे ! त्यांना काही मर्कट म्हणायचे नाही ! ते तर रामाचे सेवक ! रामाचे सैनिक !! त्यांच्या मदतीने रामाने लंकेवर स्वारी केली. रावणावर विजय मिळवला. ती सारी रामाची सेना होती ! त्यांना हजार गुन्हे माफ होते.

एक दिवस काय झाले, जेवताना लोणचे वाढायचे म्हणून मी लोणच्याची बरणी टेबलावर काढून ठेवली. बरणीचे तोंड नेहमी-प्रमाणे कापडाने बांधून ठेवलेले होते. कुठुनसे एक रामसेवक घरात शिरले आणि 'बरी लूट मिळाली' अशा आविर्भावात त्यांनी बरणी-कडे मोर्चा वळवला ! पण तेवढ्यात मुलांना चाहूल लागली आणि सर्वजण आरडाओरडा करता, काठी घेऊन धावली. रामसेवक जरा डगमगले ! इतक्यांपुढे आपला निभाव लागणार नाही, हे ओळखून माघार घेऊन निघाले. पण खिडकीतून बाहेर सटकण्यापूर्वी, निषेध म्हणून टेबलावरची लोणच्याची बरणी उचलून दाणकन जमिनीवर फेकून मग नाहीसे झाले ! ना तुला ना मला अन् घाल कुत्र्याला त्यातलीच अवस्था. माहेराहून जिवापाड जपून आणलेली ती लोणच्याची बरणी जमीनदोस्त झालेली मी माझ्या डोळ्यांनी पाहिली ! आता वर्षभर लोणचे नाही !! अन् मग ते सारे आवरून धुऊन पुसून काढण्यात जो तासभर वेळ मोडला तेवढ्यात एक धडा मनात अगदी पक्का गिरवून झाला. रामसेवकांचा हल्ला झालाच तर कधीही त्यांच्या अंगावर धावून जायचे नाही ! त्यांना गोडी-गुलाबीने त्यांची चूक पटवून द्यायची किंवा त्यांना दुसरे कसले तरी आमिष दाखवून त्यांचे लक्ष दुसरीकडे वेधायचे ! अनुभव अक्कलखाती जमा केला !

पण अशी एखादी दुसरी ठेच लागून पुरेसे शहाणपण येत नसावे ! बरेच अनुभव घ्यावे लागले अलाहाबादला. सबंध घरावर प्रशस्त मोठी गच्ची होती. पण काही पापड, सांडगे वाळत घालू म्हटले तर कठीण ! भली मोठी बांबूची काठी हातात घेऊन अगदी सज्ज बसावे लागे. तरीही नजर चुकवून दोनचार पापड तरी माकडे वसूल करतच असत. नैवेद्यच म्हणायचा ! एक दिवस पापड राखण्याची कामगिरी माझ्यावर आली. घरातून गच्चीवर जाण्याचा जिना होता, त्याच्या तोंडाशी थोड्या सावलीचा गारवा होता. म्हणून मी तिथेच माझे राखणदाराचे आसन मांडले. हातात काठी होतीच. आणि उगीचच बसून काय वेळ काढायचा, म्हणून एक पुस्तकही वाचायला घेतले होते ! मधून मधून पापडांवर नजर टाकीत होते. किती वेळ गेला असावा काही कळलेच नाही. पण कोठून तरी–बहुधा खालून स्वयंपाकघरातून–खणण् असा आवाज कानावर आला ! मी एकदम भानावर आले. समोर पाहिले ! पापड तर सारे जागेवर होते. मग डोक्यांत प्रकाश पडला. आवाज खालून आला ! मुले तर शाळेत गेली होती. कोण असेल खाली ? पापडांची राखण क्षणभर देवावर सोपवून मी खाली धाव घेतली. अर्ध्या जिन्यात खालून वर येणारे एक भले मोठे माकड–चांगले माझ्या उंचीचे–समोर आले ! मी जोरात किंचाळले ! त्याच्या तोंडात खाण्याचा तोबरा भरलेला होता !



माझ्याकडे सरळ सरळ दुर्लक्ष करून ते माकड गच्चीवर पळाले ! क्षणभर मला समजेनाच–खाली जाऊन काय झाले आहे ते पाहावे की गच्चीवर जाऊन पापडांचे संरक्षण करावे ? मनाचा निश्चय होण्याअगोदरच मी जिना उतरून खाली पोहोचले होते ! स्वयं-पाकघरातले दृश्य पाहून मटकन खालीच बसले. मुलांना दुपारी शाळेतून आल्यावर खाण्यासाठी म्हणून रव्याचे लाडू करून ठेवले होते डब्यात. तो लाडवांचा डबा जमिनीवर आडवा पडलेला होता आणि एक दोन लाडवांच्या तुकड्यांखेरीज तिथे काही नव्हते ! आता निदान पापड तरी हाती लागू देत, म्हणून पुन्हा गच्चीवर धावले. पापड जसेच्या तसे होते. लाडवांनी त्यांचे पोट बहुतेक फारच भरले होते आणि म्हणून पापडांकडे न वळता त्यांनी पोबारा केला होता !

पाच एक मिनिटे माझी अगदी धांदल उडून गेली होती. डोके जरा थंड झाल्यावर मनात विचार आला. धन्य या माकडाची ! मी एवढी मोठी काठी घेऊन इथे बसलेली असताना माझ्यामागून अगदी आवाज न करता व्यवस्थित जिना उतरून जाऊन हा आपले जेवण उरकून आला ! काही भीती वाटली नाही त्याला ! पण बऱ्याच दिवसांनंतर लक्षात आले की या माकडांना बायकांची भीती अजिबात वाटत नाही ! रंगीबेरंगी कपडे घालून, सारे अंग झाकून अन् बांगड्या नि साखळ्यासारख्या दागिन्यांचा छन-छनाट

करत जाणारा हा प्राणी अगदी निरुपद्रवी आहे अशी त्यांची खात्री असावी ! मनातून घाबरत पण भली मोठी काठी घेऊन, मोठ्या अवसानाने जोरात या माकडांवर आम्ही बायका ओरडलो तरी ती ढिम्म जागची हलत नसत ! पण तीच लंगोटी लावलेली, अर्धी चड्डी घातलेली शाळकरी पोरे नुसती जरी जोरात ओरडली तरी माकडे पळून जात असत !

सर्वांत जास्त मजा येई ती देवाच्या देवळात. सर्वसाधारणपणे देवदर्शनाला—त्यांतल्या त्यात देवीदर्शनाला-जाणाऱ्यांत स्त्रियांचा भरणा जास्त, आणि बहुतेक ठिकाणी खडीसाखर, फुटाणे हा प्रसाद ! माकडांच्या मनांत या गोष्टींची सांगड अगदी पक्की बसलेली. मोठी हुषार जात ! देवीच्या देवळातून स्त्रिया बाहेर पडल्या की ही माकडे अगदी हक्काने खिरापतीची—प्रसादाची मागणी करत. वेळप्रसंगी हातांतली पिशवी अगर चण्याचा पुडा घेऊन पसार होत. पण बायकांना त्याचेही कौतुकच ! आपल्या लहान मुलाच्या खोड्यांचे कौतुक करावे तशा स्वरांत, " धत् तेरे की ! " म्हणत खोट्या रागाने माकडांवर हात उगारायचा आणि हसत पुढे चालू लागायचे !

' आधीच मर्कट तशातही मद्य प्याला ' या वचनाची सत्यता एक दिवस पूर्णपणे पटली. देवाला नवस बोलण्यात बायकांचा हातखंडा ! एक बाई दोन तीन हारे भरून छोटी छोटी खरबुजे घेऊन एक दिवस देवळात आली आणि देवाला नैवेद्य दाखवून तिने ती खरबुजे माकडांना वाटण्यासाठी कापून ठेवायला सुरुवात केली ! एक माकड आले आणि एक फोड घेऊन गेले. आणखी एक आले दुसरी फोड घेऊन गेले ! आणि मग हळूहळू सारीजण इतकी धीट झाली की दाणे खाणाऱ्या कबूतरांसारखी माकडे त्या बाईभोवती कोंडाळे करून बसली आणि एक एक फोड खाऊ लागली. एरवी घरी खोड्या करणारी छोटी मुले बालशाळेत बाईंच्याभोवती गुपचूप बसून गोष्टी ऐकतात, गाणी म्हणतात त्याचीच आठवण झाली ! पण मग मध्येच काय बिनसले कोण जाणे. माकडांना त्या हळूहळू खाण्याचा कंटाळा आला असावा. त्यांनी संगनमत करून टोपलीवरच हल्ला केला आणि बाईचे काम क्षणात हातावेगळे झाले !

एक मात्र खरे. इतक्या तऱ्हांनी या माकडांचा उपद्रव लोकांना होत असला तरी कुणी त्यांना पकडण्याचा, जीवे मारण्याचा प्रयत्न करताना दिसले नाहीत. खरोखरच ते रामाचे सैनिक आहेत, अशी सर्वसाधारण लोकांची श्रद्धा होती. ' त्यांचा वाटा ती घेऊन गेली. उरलं ते आपलं ' अशीच सर्वांची समजूत. कधी कधी तर खूपच मोठाली माकडे यायची. संख्येनेही खूप असायची. पण एक खाण्याचा सोस वगळला तर त्यांनी कधी इतर वस्तूंची नासधूस केलेली दिसली नाही, की कधी लहान मुलांना त्रास दिला नाही ! तसे हे सैन्य मोठे शिस्तबद्ध होते !

अलाहाबादहून पुण्याला बदली झाली तेव्हा मुलांना सर्वांत मोठे दुःख झाले असेल तर ते या माकडांच्या विरहाचे ! पण निघता निघताही या सैनिकांनी आम्हांला हिसका दाखवलाच ! सामान वगैरे फलाटावर ठेऊन आम्ही गाडीची वाट पाहात होतो. निरोप देण्यासाठी आलेल्या मंडळींशी बोलत होतो. बोलण्याच्या नादात माझ्या हातातील केशरी पिवळट रंगाची गोलाकार पर्स मी क्षणभर इकडे तिकडे कुठेतरी ठेवली आणि खरबुज आहे असे वाटून एका रामसैनिकाने ती पळवली ! माझ्या तोंडचे पाणीच पळाले. पैसे, किल्ल्या, आगगाडीची तिकिटे, सामानाच्या पावत्या सारे त्यांतच होते. क्षणभर काही सुचेना ! पण इतक्या दिवसांच्या सहवासाने या सैनिकांची मने मला चांगली माहीत झाली होती. शेजारच्या पुरी-भाजीवाल्याकडून चार पुऱ्या, थोडी भाजी घेतली आणि कागदावर ठेऊन दिली—जिथे पर्स होती तिथेच ! रामरायाची आळवणी करत तिकडे पाठ करून उभी राहिले ! उपाय बरोबर लागू पडला ! रामसेवक एका उडीत खाली आला आणि पर्स ठेऊन पुरीभाजीचा कागद घेऊन पळाला !

या रामाच्या सैनिकांच्या आठवणी अजूनही मनात अगदी ताज्या आहेत.



## आपले भाईबंद

उत्क्रांतीच्या तत्त्वानुसार माकडाची आणि मानवाची जात एक असल्याचे प्राणिशास्त्रज्ञांनी अलीकडे सिद्ध केले आहे. पण माकड, वानर हे प्राणी आपल्यासारखे आहेत ही जाणीव माणसाला फार पूर्वीच्या काळापासून असावी. कारण एक शेपटी सोडली तर माकडाच्या शरीराची रचना बरीचशी माणसाच्या शरीररचनेसारखी आहे हे वरवर पाहातानासुद्धा ध्यानात येण्यासारखे आहे. हनुमान हा रामाचा एकनिष्ठ सेवक आणि रावणाबरोबर केलेल्या युद्धात त्याच्या वानरसेनेने रामाला साहाय्य केले अशी रामायणात कथा येते. ती माणसे आणि माकडे यांच्यातले सारखेपण रामायणकर्त्या वाल्मिकी ऋषींनी लक्षात घेतले ही गोष्ट उघडच आहे. कोल्ह्यांची किंवा अस्वलांची सेना रामाला मदत करते, असे दाखवले असते तर ते आपल्याला चमत्कारिक वाटले असते. वानराचे शरीर पुष्कळसे माणसासारखे आहे आणि माणसासारखी वानरालाही थोडीबहुत बुद्धी आहे; म्हणून रामाच्या वानरसेनेत आपल्याला विचित्र असे काही दिसत नाही. डार्विनच्या उत्क्रांतीवादाने माकडे हे आपले जातभाई किंवा भाईबंद हे आता दाखवून दिलेच आहे. परंतु पुष्कळ वेळा माकडे हे आपले 'पूर्वज' होत असे म्हटले जाते ती मात्र चूक होय. माकड माणसाचा पूर्वज म्हटला तर आजच्या माकडापासून पुढील काळी कधीतरी माणूस उत्क्रांत होईल, असा तर्क करावा लागेल पण तो अगदी चुकीचा आहे. माणूस व माकड यांचा पूर्वज कोणीतरी एक होता ही खरी गोष्ट आहे. या प्राण्यापासून एका बाजूला माणसे आणि दुसऱ्या बाजूला माकडे उत्क्रांत झाली. सिंह, वाघ, मांजर हे जसे एकमेकांचे भाईबंद किंवा घोडा, गाढव, झेब्रा हे जसे एकमेकांचे भाईबंद तसेच माकड आणि माणूस हे एकमेकांचे भाईबंद.



झाड-चिचुंद्री हा प्राणी माणसाचे भाईबंद असलेल्या पहिलट प्राण्यांमधील सर्वांत जुना. झाडाची फांदी त्याने आपल्या हाता-पायांच्या बोटांनी पकडली आहे. पाहा.




माणूस व माकड ज्या प्राणिवर्गात मोडतात त्याला इंग्रजीत 'प्रायमेट' असे म्हणतात. 'प्रायमेट' म्हणजे प्रथमचे किंवा पहिले. सर्व प्राण्यांमध्ये माणूस हा बुद्धीने सर्वश्रेष्ठ आहे आणि म्हणून पहिला आहे. या दृष्टीने माणसाच्या जातीचा जो प्राणिवर्ग आहे त्याला प्राणिशास्त्रज्ञांनी 'प्रायमेट' असे नाव दिले आहे. 'प्रायमेट'ला आपण 'पहिलट' असे म्हणू. या पहिलट प्राण्यांमध्ये माणूस, माकड आणि माकडाच्या अगोदरच्या अवस्थेतले काही प्राणी यांचा समावेश होतो. माकडाच्या अगोदरच्या अवस्थेतल्या प्राण्याला 'प्रोसिमिअन' म्हणजे 'पूर्वमर्कट' असे म्हणतात.

ज्यांना आपण 'पहिलट' असे म्हटले त्यांत सुमारे २०० जातींचे प्राणी आहेत. झाडावर राहणारा चिचुंद्रीसारखा एक प्राणी या वर्गात मोडतो. या झाड-चिचुंद्रीपासून तर शरीरदृष्ट्या अत्यंत विकसित झालेल्या मानवापर्यंत नाना तऱ्हेचे प्राणी या वर्गात येतात. पूर्वमर्कट हा या प्राण्यांचा जो पोटवर्ग आहे, त्यात झाड-चिचुंद्राखेरीज लेमूर हा महत्त्वाचा प्राणी आहे. या वर्गातले प्राणी हे वृक्षवासी–म्हणजे झाडावर राहणारे असल्यामुळे झाडावरील जीवनात आवश्यक अशी त्यांची शरीररचना तयार झाली. त्यांच्या शरीररचनेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या पायांना वाघसिंहांसारखे पंजे नसून आंगठा व बोटे असतात. दृष्टी, वास, जनन व अपत्याचे पालन या बाबतींतही या प्राणिवर्गामध्ये काही समान शरीरधर्म आढळतात. तथापि या वर्गातल्या सर्व प्राण्यांना समान असलेली जर कोणती गोष्ट असेल, तर ती म्हणजे झाडावर चढण्याउतरण्यासाठी आपल्या बोटांचा पकडीसारखा उपयोग करता येतो ही होय.

या वर्गातले प्राणी मुळात झाडांत राहणारे आहेत. झाडांत त्यांची उत्पत्ती झाली आणि झाडांतच त्यांचा विकास झाला.






माणसाच्या भाईबंदांपैकी असलेला लेमूर हा प्राणी मालागासी (मादागास्कर) या बेटांवरच फक्त आढळतो. त्याच्या दहा जाती असून प्रत्येक जात वेगळी आहे. डावीकडील लेमूरच्या शरीराची ठेवण खारीसारखी आहे; तर उजवीकडील लेमर हा जवळजवळ माकडासारखा आहे.

झाडाची फांदी आपल्या बोटांनी पकडण्याच्या वैशिष्ट्यामुळे हे प्राणी झाडावर राहणाऱ्या इतर सर्व प्राण्यांना भारी ठरले. उदाहरणार्थ रानमांजर हा झाडात राहणारा प्राणी आहे. फांदीत आपल्या पंजाची नखे खुपसून झाडावर त्याला तोल राखता येतो. याउलट माकड किंवा वानर आपल्या बोटांनी फांदी पकडू शकत असल्यामुळे त्याचे सर्व शरीर मोकळे राहून त्यांच्या एकूण हालचालींत विलक्षण चपळपणा आला. माकड फांदीच्या वर किंवा खाली कसेही शरीर झोकू शकते. उलट रानमांजर फक्त फांदीवरूनच जाऊ शकत असल्यामुळे त्याच्या हालचालींना मर्यादा आली. बोटांनी फांदीची पकड घेऊ शकणारे प्राणी झाडांच्या डोलाऱ्यात सरासर फिरू शकतात. झाडाच्या फांदीच्या टोकापर्यंत जाऊन तेथली फळे खाऊ शकतात. तोल जाऊन खाली पडण्याची भीती त्यांना नसते. यांमुळे अन्न त्यांना अधिक सुलभपणे मिळवता येऊ लागले आणि अन्न मिळण्याचे त्यांचे क्षेत्रही वाढले. तसेच कोणा शत्रूचा हल्ला आला तर झाडांमध्ये झपाट्याने पसार होणे त्यांना अधिक सोपे झाले. अशा रीतीने त्यांच्या जगण्यात सुरक्षितता व स्थैर्य आले, त्यांच्या मेंदूचा विकास होत गेला आणि इतर वर्गांच्या प्राण्यांना ते वरचढ ठरले.

एखाद्या प्राण्याच्या शरीररचनेत परिस्थितीनुसार असा अनुकूल बदल होऊ लागला की, तो सारखा होत राहतो असे उत्क्रांतीचे एक सत्य आहे.

झाडाच्या फांद्या पकडणे, खाणे, अंग खाजवणे व स्वच्छ करणे यांसारख्या कृतींमधून या प्राण्यांचे बोटांवरील नियंत्रण वाढत गेले व त्यांची कार्यक्षमता वाढली. अंतिमतः माकडांना आंगठा व बोटांच्यामध्ये छोट्या छोट्या वस्तू पकडता येऊ लागल्यात. ही



काळ्या तोंडाचे भारतीय वानर

कार्यक्षमता सर्वांत अधिक वाढली ती मानवप्राण्यांमध्ये. बोटांचा याप्रकारे उपयोग करू लागल्याने मानवाचा मेंदू व मज्जातंतू यांचा आकार वाढत जाऊन त्याची बुद्धी विकसित झाली. माणसाचे श्रेष्ठत्व त्याच्या बुद्धीत आहे आणि त्याला ही बुद्धी बोटांच्या पकडीचा उपयोग करून प्राप्त झाली आहे हे यावरून स्पष्ट होईल.

माकडे ही अशा प्रकारे माणसाचे भाईबंद होत. माकडांमध्ये पुन्हा दोन प्रकार किंवा गट आहेत. इंग्रजीत त्यांना 'मंकी' व 'एप' अशी दोन वेगळी नावे आहेत. मराठीत मात्र या दोन्हीस माकड असे एकच नाव आहे. 'मंकी' या प्रकारातील माकडे चतुष्पाद प्राण्यांप्रमाणे चारी पायांवर चालतात; त्यांना लांब शेपट्या



बाबून मादा आपल्या पिलाला घेऊन बसली आहे. या माकडाचे तोंड बरेचसे कुत्र्याच्या तोंडासारखे असते.

असतात आणि त्याची वस्ती झाडांवर असते. 'एप' या प्रकारातील माकडे माणसासारखी दोन पायांवर उभी राहू शकतात, त्यांना शेपटी नसते आणि झाडांवर ते सराईतपणे चढू शकत असले तरी त्यांची वस्ती जमिनीवरच असते. पहिल्या चार पायांवर चालणाऱ्या प्रकारात अनेक जातींच्या माकडांचा समावेश होतो. त्यांत काळ्या तोंडाचे भारतीय वानर, आफ्रिका खंडातले बाबून व पूर्व आशियातले माकाक्यू आणि दक्षिण अमेरिकेतील 'कोळी' माकड (स्पायडर मंकी) या प्रमुख जाती होत. दोन पायांवर उभ्या राहणाऱ्या दुसऱ्या प्रकारच्या माकडांमध्ये दक्षिण आशियातील गिबॉन व ओरँगउटँग आणि मध्य आफ्रिकेतील चिंपाझी व गोरीला या चार जाती आहेत.

आपल्या या भाईबंदांची आपण आता ओळख करून घेऊ. चार पायांवर चालणाऱ्या व लांब शेपटीच्या पहिल्या प्रकारात माकडांच्या अनेक जाती आहेत हे वर सांगितलेच आहे. भूखंडाच्या ज्या भागांत ते राहतात, त्या भागांतील परिस्थितीनुसार त्यांच्या शरीराचा आकार, तोंडाचा रंग व स्वभाव यांत फरक पडलेला आढळून येतो. भारतात काळ्या तोंडाची व मोठ्या शरीराची वानरे आढळतात ती या प्रकारातील प्रमुखपैकी जात होय. मध्य आफ्रिकेतही या जातीची वानरे आहेत. ही वानरे प्रमुखतः झाडांचा पाला खाऊन त्यावर आपली भूक भागवतात. त्यांना खाण्यासाठी पाने भरपूर मिळतात. पण पाने तेवढी काही पौष्टिक नसतात. पानांपासून पुरेसा पौष्टिक आहार मिळावा म्हणून या जातीच्या वानरांनी आपल्या पोटाचा आकार खूपच मोठा वाढवला आहे. या वानराने एकदा पोट भरून पाने खाल्लीत की त्याचे पोट एवढे फुगल्यासारखे दिसते,



शत्रूला भेडसावण्यासाठी बाबूनने मानेवरचे केस फिस्कारून घेतलेला आक्रमक पवित्रा

की हा नर आहे का पोटुशी गेलेली मादी आहे ते सांगणे कठीण जाते. झाडाची पिकलेली रसरशीत पाने खाऊन वानरांना त्यांतून पाण्याचा पुरवठाही होतो. यामुळेच भारतीय वानर तर कित्येक दिवस पाण्यावाचून राहू शकतो. सर्वसाधारणपणे ज्या कोरड्या प्रदेशात इतर जातींची माकडे पाण्याच्या अभावी जगू शकणार नाहीत, तेथे ही वानरे तग धरू शकतात.

ही वानरे तशी फार भेकड असतात. कोठे काही धोका दिसताक्षणी ती लपून बसतात किंवा झट्दिशी पळून जातात. त्यांचे तोंड हे अगदी खास 'माकडाचे तोंड' असते. शरीर लांब व सडपातळ असते. त्यांच्या लांबट हातापायांमुळे ती अतिशय चपळ झालेली आहेत. झाडावरील त्यांच्या जगण्यामधून त्यांच्या


ठिकाणी हा चपळपणा आलेला आहे. वानर झाडाच्या बारीक निमुळत्या फांद्यांपर्यंत सहज लीलेने जाऊ शकतो. शंभर-सव्वाशे फूट उंचीच्या झाडाच्या शेंड्यापासून ते बुंध्यापर्यंत काही क्षणांच्या आत तो उतरतो आणि दोन झाडांमधील पंचवीस-तीस फुटांचे अंतर एका उडीत तोडतो. झप्‌दिशी घेतलेली त्याची ही उडी मोठी प्रेक्षणीय असते. झेप कधी चुकणार नाही अशी त्याची उडी असते.

या प्रकारातील बाबून या जातीचे जे दुसरे माकड आहे, ते वानरापेक्षा पुष्कळच वेगळे आहे. बाबूनचे शरीर भक्कम, मोठे व दणकट असते. बाबून झाडात झोपते. त्याचे खाणेही बहुधा झाडावरच चालते आणि कोणी शत्रू चाल करून आल्यास ते झाडाचाच आसरा घेते. परंतु दिवसाचा बहुतेक वेळ ते जमिनीवर असते. जमिनीवर अशा प्रकारे राहात असल्यामुळे बाबूनना शत्रूंचा नेहमी धोका असतो. त्यांचे शत्रू म्हणजे सिंह, चित्ते, तरस व लांडगे. अशा हिंस्र शत्रूपासून संरक्षण करण्याकरिता बाबून नरांनी लांब मोठे दात आणि अशा दातांसाठी बळकट जबडे विकसित करून घेतलेले आहेत. पण जे प्राणी दातांचा लढण्यासाठी उपयोग करतात त्यांची मान व खांदे हे अवयवसुद्‌धा दणकट असावयास हवेत. बाबूनचेही असे असतात. विशेष म्हणजे बाबून समुहाने शत्रूशी लढतो. बाबूनच्या शरीराची एकूण रचना जमिनीवर लढणाऱ्या प्राण्याची आहे. त्याचे तोंड कुत्र्यासारखे लांबट असते आणि त्याचे नाकही थेट कुत्र्यासारखेच असते. त्याच्या छातीचा भाग रुंद असतो आणि मानेवरच्या केसांमुळे तो अधिकच उग्र दिसतो. बाबून झाडावर चढण्यात सराईत नाही, तसेच एका झाडावरून दुसऱ्या झाडावर मोठी उडी त्याला मारता येत नाही. एकूण बाबून कणखर व आक्रमक असतो आणि सिंहासारखे मोठे प्राणी आणि शस्त्रधारी माणूस सोडल्यास इतर कोणत्याही प्राण्याशी लढण्याची त्याची तयारी असते.

बाबून असा उफाड्या अंगाचा व दणकट असला तरी वाघासारख्या प्राण्याबरोबरच्या लढाईत आपण जिंकूच याची त्याला नेहमीच खात्री नसते आणि लढाई जिंकली तरी तो पुष्कळच जखमी होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत शत्रूचा हल्ला टाळता आला तर केव्हाही बरे! बाबून असा हल्ला टाळण्यासाठी शत्रूला पोकळ दमात घेण्याची युक्ती करतो. तो आपल्या मानेभोवतीचे केस फिस्कारून उभे करतो. त्यामुळे तो अधिकच मोठा दिसतो आणि त्याचे रूप भयंकर वाटते. पुष्कळ वेळा हे रूप पाहून हल्ला करणारा प्राणी यशस्वी माघार घेतो.

बाबून आणि त्याच्याच जातीचे माकाक्यू या माकडाच्या जातींचा इतर सर्व जातींपेक्षा फार मोठ्या प्रदेशात संचार आहे. त्याचे कारण त्यांच्या ठिकाणी असलेली आक्रमक वृत्ती हेच होय. केवळ झाडांच्या आश्रयावर अवलंबून न राहता जमिनीवर वस्ती केल्यानेच या जातींमध्ये आक्रमक वृत्ती वाढीस लागली आणि इतर सर्व माकडांपेक्षा त्या जीवनकलहात अधिक यशस्वी झाल्यात. माणसाच्या बाबतीत नक्की हेच घडले.





दक्षिण अमेरिकेतील 'कोळी' माकडाची ही दोन चित्रे. लांब शेपूट हा या माकडाचा हातापायांइतकाच उपयुक्त अवयव. झाडाची फांदी किंवा इतर वस्तू पकडण्यास तो शेपटीचा उत्तम प्रकारे उपयोग करू शकतो.

दक्षिण अमेरिकेतील जंगलात माकडांच्या अनेक जाती आहेत. खार-माकडासारखी काही जातीची माकडे तर खार किंवा घुशी-एवढी चिट्टी असतात. त्यांत 'कोळी' माकड ही सर्वांत महत्त्वाची जात होय. शेपटी हा अवयव जर कोणाला सर्वांत अधिक उपयुक्त असेल तर तो या कोळी माकडाला! त्याची ही लांबसडक शेपटी एवढी बळकट असते की तो आपले सर्व शरीर शेपटीवर टांगते ठेवू शकतो. तसेच शेपटीला स्पर्शाची संवेदना इतकी तीव्र असते की माकड शेपटीने बोरासारखा बारीक पदार्थ अचूक शोधून काढून उचलू शकतो. शेपटीच्या टोकाकडील भागास केस नसतात व खालच्या बाजूला कडाकडा असतात. यामुळे शेपटीच्या टोकाने माकड अतिशय पक्की पकड घेऊ शकते. 'कोळी' माकडाला आपल्या शेपटीचे एवढे महत्त्व वाटते की, दोन माकडे एकमेकांचे हात धरण्याऐवजी शेपट्या धरतात. पिले पुष्कळ वेळा आपल्या आईस शेपटीने मिठी मारतात.

पायांवर उभी राहणारी व शेपटी नसलेली दुसऱ्या प्रकारातील गोरिला, चिंपाझी वगैरे माकडे ही माणसाच्या अधिक जवळपासची होत. यांची ओळख पुढील अंकी करून देऊ.

# सृष्टीतील नवलकथा

प्रकाश सावंत · प्रकाश साटम

सृष्टीतील काही प्राणी फारच गमतीदार आहेत.




आफ्रिकेतील जिराफाच्या जातीचा ओकापी- हा प्राणी बैलाएवढा असतो- पण ह्याचे तोंड व धड जिराफासारखे, मान काळविटासारखी तर पायावरील पट्टे झेब्राप्रमाणे असतात. असा हा मजेशीर प्राणी चालू शतकापूर्वी अज्ञात होता-

तर ऑस्ट्रेलियातील प्लॅटिपस हा चोच असलेला व अंडी घालणारा एकमेव सस्तन प्राणी. बदकासारखी चोच व पाय लाभलेल्या प्लॅटिपसच्या अंगावरील लोकर व शेपूट बीव्हर या प्राण्यासारखी असते.



अमेरिकेतील स्लोथ ह्या प्राण्याची तऱ्हा वेगळीच- झाडावर लोंबकळण्यातच तो आपले आयुष्य घालवितो. उलट्या टांगलेल्या अवस्थेतच तो हालचाल करतो, खाद्य मिळवितो व निद्राही घेतो- हा प्राणी अत्यंत भावनाशून्य आहे.





# सती

: पुरुषोत्तम महाले :

सती. एका मजुराची पोर. वय वर्षे अकरा! मार्केटपासून जवळच एका फूटपाथवर ती, तिचे आई-वडील व दोन लहान भावंडे असे हे कुटुंब रहात असे. सार्वजनिक मुतारीच्या भिंतीला आणि जवळच्या झाडाला टेकून त्यांनी आपली चंद्रमौळी उभी केली होती. तीन दगड मांडून त्यावर दिवसाकाठी काय मिळेल ते शिजवून ते कुटुंब खाई. सतीच्या वडलाला कधी कधी काम मिळे. पण महिन्यातील बरेच दिवस तो रिकामाच असे. आई दोन मुलांना बरोबर घेऊन भीक मागत फिरे. कधी चार पैसे मिळत. पण रोज भाजी आणण्याचे काम सतीवर असे.

सती रोज जवळच्या मार्केटमध्ये जाई. तेथे दुकानदाराने फेकून दिलेली सडकी कुजकी भाजी गोळा करून ती घरी आणीत असे.

पण एके दिवशी तिला काही भाजी मिळाली नाही. काय करावे या विचारात सती एका दुकानापाशी उभी होती. काही जण भाजी खरेदी करीत होते. त्यांच्यापैकी एकाच्या हातातून कोबीच्या राशीतील एक कोबी गडगडत खाली पडला. दुकानदाराचे लक्ष नसावे या समजुतीने सतीने तो पटकन् उचलून आपल्या झोळीत टाकला.

सतीची समजूत चुकली. भाजी तोलून गिऱ्हाइकांना देण्यात जरी त्या दुकानदाराचे हात गढले होते, तरी खाली पडलेल्या कोबीकडे त्याचे चांगले लक्ष होते. वाघाने झडप घालावी त्याप्रमाणे त्या दुकानदाराने सतीवर झडप घातली. तिचे केस पकडले. पाठीत दोन चार बुक्के मारले अन् ओरडला, "चोर कुठली, देऊ का पोलिसाकडे?"



तेवढ्यात तेथे बघ्यांची गर्दी जमली. सती स्फुंदून स्फुंदून रडत होती. आपल्या फाटक्या परकराने डोळे पुशीत होती.

"जाऊ द्या विचारीला, लहान आहे." कुणीतरी उद्गारले. "लहान? हीच कार्टी महाभयंकर असतात. द्या तिला पोलिसाच्या हाती." दुसरा म्हणाला.

तोपर्यंत सती गर्दीबरोबर दूर गेली होती. दुकानदारभय्या पुन्हा भाजी मांडून ठेवत होता. काही सडलेले बटाटे, टोमॅटो तो फेकून देत होता. सती दुरून ते पाहात होती. पण पुन्हा जाऊन ते उचलून आणण्याची तिची हिम्मत होत नव्हती. पोलिसाच्या तावडीतून सुटले एवढ्यावरच ती सारे विसरली व रिकाम्या हाताने घरी परतली.

आई वाटच पाहात होती. सतीला रिकाम्या हाताने परतलेली पाहून तिच्या रागाचा पारा चढला. "काय आणलंस? कुठाय पिशवी?" असे ओरडत तिने सतीच्या कानाला धरून तिला जमिनीवर लोटून दिली.


डोळ्यांतील अश्रू आवरीत सती चकार शब्द न बोलता जाऊन भिंतीला टेकून बसली.

तेवढ्यात तेथून एक पोलीस चालला होता. कामावरून घरी परतताना बाजारात फेरफटका मारण्याचा त्याचा नेहमीचा शिरस्ता होता. एका दुकानातून त्याने थोडा कॉलीफ्लॉवर उचलून पिशवीत टाकला. दुसऱ्या दुकानातून थोडे बटाटे उचलले. पण एकाही दुकानदाराने तक्रार केली नाही. पोलिसाने पिशवी भरून भाजी घरी नेताना सतीने पाहिले.

त्या रात्री सती, तिची भावंडे, आई-वडील पेज खाऊन राहिले. पण सतीला रात्रभर झोप नव्हती. रस्त्यावरून माल भरलेले ट्रक जाऊ लागले की, जमीन हादरे व सतीची छाती धडधडे. आकाश निरभ्र होते. तारे लुकलुकत होते. त्याकडे पाहात ती पडून होती.

दुसऱ्या दिवशी सती रोजच्याप्रमाणे बाजारात गेली. फक्त फेकून दिलेली भाजीच ती उचलीत होती. तो शनिवारचा दिवस होता. भिकाऱ्यांची संख्या वाढली होती. कुणी गाईला चारा अन् पैसे देत होते. दुकानदार भाजी, फळे रचून ठेवीत होते.

तेथे एक साधू आला. दुकानदाराने एक चांगलेसे संत्र पाहून त्याच्या झोळीत टाकले. "तुझ्या धंद्याला बरकत येवो, बालबच्चे सुखी होवोत." असा आशीर्वाद देऊन तो साधू पुढल्या दुकानी



गेला. सती त्याकडे टक लावून पाहात होती. नंतर ती फेकून दिलेल्या सडक्या, कुजक्या भाजीच्या ढिगाऱ्याकडे वळली. कोबीची पाने, किडलेले टोमॅटो उचलून तिने पिशवीत टाकले.

एवढ्यात तो दुकानदार ओरडला, "ए पोरी, चल पळ येथून !" सती तेथून धावत सुटली व घरी आली. पण एक प्रश्न तिच्या मनात सतत येत होता. दुकानदार त्या पोलिसाला, साधूला चांगली भाजी, फळे का देत होते आणि मी मात्र सडकी, कुजकी भाजी उचलली तरी का ओरडत होते ? मी चोरी थोडीच केली होती ?

पण या प्रश्नाचे उत्तर तिला काही केल्या मिळेना !

मागील अंकातील कोड्याचे उत्तर....

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 सं | क्रां | 2 त | | 3 शि | 4 प | ला | |
| दु | | 5 हा | त | क | डी | | 6 लो |
| 7 क | 8 मा | न | | | 9 क | 10 पा | ट |
| | ल | | | 11 ग | | ठां | |
| 12 न | गा | धि | 13 रा | ज | | 14 त | डा |
| 15 खे | डी | | ग | | 16 ता | र | |
| | | 17 स | दा | फु | ली | | 18 फू |
| | 19 पिं | जा | री | | 20 म | शा | ल |

बँक ऑफ महाराष्ट्र




तुमच्या मुलीचें
भवितव्य
तुमच्याच हातीं

पुढील अनिश्चिततेपासून
तिच्या रक्षणाची तरतूद करा.
स्टेट बँकेत
नियमित बचत करा.

**सेवेसाठीं**
**स्टेट बँक**

S-273 MRA



# स्वाभिमान

— चंद्रकांत देऊळगावकर

फार फार वर्षांपूर्वी पांचाल नगरीत घडलेली कथा आहे ही.

पांचाल राजा पांचाल देशात राज्य करत होता. त्याच सुमारास बोधिसत्वांनी एका ब्राम्हणकुळात जन्म घेतला होता. तरुणपणात त्यांनी सर्व विद्या शिकून घेतल्या व संन्यास घेऊन ते हिमालयाकडे निघून गेले. तिथे कंदमुळे खाऊन ते जीवन व्यतीत करू लागले. बरीच वर्षे कंदमुळे–फळे खाऊन खाऊन त्यांचा जीव उबगला. ते पांचाल नगरीकडे निघाले. राजाने बोधिसत्वांना आपल्या राजशाही उद्यानात उतरवले. बोधिसत्वांची उत्तम व्यवस्था झाली. राजप्रासाद उद्यानापासून जवळच होता. रोज राजाबरोबरच बोधिसत्वांचे भोजन होत असे. वर्षाऋतूचे चार महिने पाहाता पाहाता संपले. बोधिसत्व हिमालयाकडे परत येण्याच्या विचारात होते. उन्हाचा त्रास होऊ नये, दगड, काटेकुट्यांचा त्रास होऊ नये म्हणून एक छत्री व वहाणा तरी राजाकडून मागून घ्याव्यात असा विचार त्यांच्या मनात आला.

त्याही दिवशी नेहमीप्रमाणे राजा बोधिसत्वांच्या दर्शनासाठी उद्यानात आला होता. राजाने बोधिसत्वांना नमस्कार केला व त्यांच्या चरणांपाशी बसून राहिला. छत्री व वहाणा मागण्याची आठवण बोधिसत्वाना होतीच. ते आता बोलणार तोच त्यांच्या डोक्यात विचार आला—कोणापुढे तोंड वेंगाडून मागणे म्हणजे एकप्रकारे रडणेच आहे. मागणारा मागण्यासाठी रडतो व न देणारा देता येत नाही म्हणून रडतो. तेव्हा जनतेने मला व राजाला अशाप्रकारे रडताना पाहाणे योग्य नाही. तेव्हा कधीतरी एकान्तस्थळी राजाला विचारावे म्हणजे दोघांनाही रडताना कोणी पाहाणार नाही.

बोधिसत्वांनी राजास एकान्तात भेट घेण्याची इच्छा दर्शवली. बरोबर आलेल्या सर्व लोकांना राजाने उद्यानाबाहेर निघून जाण्याची आज्ञा दिली. आता बोधिसत्वांच्या डोक्यात विचार आला की, आपण राजाकडे या वस्तू मागितल्या आणि त्याने दिल्या नाहीत तर उगीचच आपल्या मैत्रीत बिघाड निर्माण व्हायचा. त्यापेक्षा न मागणेच बरे. ते म्हणाले, "राजा, तुझ्याशी काही बोलायचं होतं. पण आज नको–पुन्हा केव्हातरी बोलू."

राजा रोज उद्यानात येई. बोधिसत्व बोलण्याची इच्छा प्रदर्शित करत पण काहीच बोलत नसत. अशा प्रकारे बारा वर्षे निघून गेलीत पण बोधिसत्वांनी एकान्तात भेटी घेऊनही, राजाकडे काहीही मागितले नाही. राजाला या घटनेचे मोठे आश्चर्य वाटले. तो

मनात म्हणाला, "आचार्य असं का वागतात काही कळत नाही. बारा वर्षे झाली, ते एकान्तात भेट घेतात पण काहीच बोलत नाहीत. कदाचित त्यांच्या मनात राज्योपभोगाची इच्छा तर निर्माण झाली नसेल ना ? शक्य आहे. सारं जीवन ब्रम्हचर्यात गेलं तेव्हा आता सुखाची लालसा मनात निर्माण झाली असेल. पण राज्य कसे मागावे या संभ्रमात ते पडले असतील. आपण स्वतःच त्यांना राज्यदान करून टाकावे म्हणजे झालं."

दुसऱ्या दिवशी राजा उद्यानात आला. बरोबर राजपरिवार होताच. बोधिसत्वांनी पुन्हा एकान्तात भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली. सर्व परिवार उद्यानाबाहेर निघून गेला. राजाने विचारले, "आचार्य, आपण गेली बारा वर्षे एकान्तात माझी भेट घेत आहात पण भेटीत काहीच बोलत नाही. आपल्याला कसला संकोच वाटतो ? आपण विनासंकोच जे मागावयाचे आहे ते मागून घ्या. हे राज्यसुद्धा मी द्यावयास सिद्ध आहे."

"मी जे मागेन तेच देशील ?"

"अवश्यमेव, आचार्य !"

"हे राजा ! मला एक छत्री व वहाणा या दोन वस्तू पाहिजेत."

"बस्स्. एवढ्या दोनच वस्तू ? बारा वर्षे या दोन वस्तू आपण माझ्याकडे मागू शकला नाहीत ?"

"होय, महाराज."

"यात एवढं कठीण काय होतं, गुरुदेव !"

"त्याचं कारण असं आहे महाराज," बोधिसत्व म्हणाले, "'मला द्या' असं म्हणून जो कोणी मागतो त्याला आपल्या दारिद्र्याबद्दल संकोच वाटत असतो, तो एक प्रकारे रडतच असतो आणि मागितल्यानंतर आपण त्या वस्तू देऊ शकत नाही म्हणून देणाराही रडतो. त्याला आपल्या असमर्थतेची लाज वाटते. मी जर आपल्याकडे वस्तु मागितल्या असत्या व आपण दिल्या नसत्या तर आपल्या दोघांचे रडणे प्रजेने पाहिले असते. म्हणून तर मी एकांतात भेट घेऊ इच्छीत होतो. पण एकांतात माझा हा स्वाभिमान जागृत व्हावयाचा. म्हणून बारा वर्षे या गोष्टीवर सारखा विचार करत होतो."

"महाराज, आपला विचार अत्यंत योग्य आहे. त्या दोन वस्तू तर मी आपल्याला देतोच. पण हजार गायी पण देऊ इच्छितो."

"राजा, मला अन्य कोणत्याच वस्तूंची आवश्यकता नाही. मला फक्त दोनच वस्तू दे. त्या वस्तू घेऊन मी जाईन." बोधिसत्वांनी छत्री व वहाणा घेऊन हिमालयाकडे प्रस्थान केले.

# घुबड



फांदीवर मैना
गाते गाणे
कावळा म्हणतो
'वाः ग शहाणे ऽऽ'

चिमणीस त्याचा
येतोय् राग
मध्येच कोंबडा
देतोय् बांग

दुरून हसतो
खुळा मोर
भलताच येतो
त्याला जोर

अखेर घुबड
पुढे येते
ऐटीत म्हणते—
'मीच गाते'

अंधार येतो
दण दण
पसार होतात
सारे जण

घुबड म्हणते
झाले ठीक
नक्कोय कुणाची
मला भीक !

—बाबा मोहोड



# अन्याय अन्याय!

: मलिका अमर शेख :

हो ! अन्याय नाही तर काय ? मोठ्या माणसांवर अन्याय झाला की ते लगेच संप करतात, 'घेराव' घालतात. पण आम्हां लहान मुलांवर जर या मोठ्या माणसांनीच अन्याय केला, तर आम्ही अन्यायाची दाद कुठे बरे मागावी ?

अहो, परवाच सहामाही परीक्षेचा 'निकाल' लागला आणि त्याबरोबर आमचापण ! पण शेजारच्या संजूचा दुसरा नंबर आला. केवढा आनंद झाला तिला ! आनंदाने उडत, नाचत आली ती घरी. तिला वाटले, 'आईला केवढा आनंद होईल.' आपली गोडशी पापी घेऊन ती म्हणेल, 'माझी गुणाची बाळ ती !' मग आपल्याला खूप खाऊ मिळेल....पण कसचे काय नि कसचे काय ?....आईपुढे प्रगति-पुस्तक धरून तिने उत्सुक नजरेने आईकडे पाहिले. आई म्हणाली, "वा छान ! अग, पण आणखी थोडा अभ्यास केला असतास तर पहिला नंबर नसता का आला ?" संजूचे आनंदाने फुललेले तोंड एवढुसे झाले. टपोऱ्या डोळ्यांतले झळझळते इंद्रधनुष्याचे किरण पार विरून गेले. आईने सरळ सरळ पचकाच केला की !



आमच्या अडगळीच्या खोलीत किनई एक जुनीपुराणी फ्रेम होती. छान चित्र होते त्यात. पण काच अर्धवट फुटल्यामुळे ती फ्रेम अडगळीच्या खोलीत जाऊन पडली होती. कोणाच्या लक्षातही नव्हते. मी हळूच ती फ्रेम उचलली. तिची राहिलेली काच फोडली आणि नवीन काच बसवण्यासाठी फ्रेमवाल्याकडे दिली. कुण्णाला सांगितले नाही. सगळ्यांना एकदम चकित करायचे होते; पण दुसऱ्याच दिवशी फुटलेल्या काचा कचऱ्याच्या कुंडीत पाहून आई ओरडली, "काय फोडलंस आणखी ?" आता सांगायचे काय ? पण चांगल्या कामात अडचणी येतातच, नाही का ? मुकाट्याने मी ओरडा खाल्ला. पण आईला काच कशाची फुटली, हे कळू दिले नाही ! खाऊचे जमवलेले सर्व पैसे फ्रेमवाल्याच्या पेटीत गेले. आणि त्या संध्याकाळी भिंतीवर एक छान फ्रेम दिसू लागली. आईने शांतपणे ते पाहिले आणि म्हणाली. "काही जरूर होती का याची ? नसती अडगळ ! म्हणून ती काच फोडलीस होय ? काय डोकं तरी ?" झाले ! मी ढगातून जमिनीवर आपटले.

आता ती काच थोडी फुटलीच होती. ती पूर्ण फोडली म्हणून एवढा आरडाओरडा करायची काय जरूर होती? आमच्या ताईसाहेबांनी तर फ्रेम पाहिल्याबरोबर विचारले, "काच बसवायचे एवढे पैसे कुठून आणलेस?" आहे की नाही? म्हणजे आम्ही एवढे केले त्याचे कुणाला चीज?

पण कुणी पाहुणे यायचे झाले की, मात्र सगळ्यांचे वागणे बदलते. या महागाईच्या दिवसात पाहुणा म्हणजे कोण तापदायक! पण १०-१५ दिवस राहण्याची इच्छा असणारे पाहुणे अस्मादिकांच्या पराक्रमामुळे दोन दिवसांत आपल्या गावी पळतात! हे एवढे चांगले काम केल्याबद्दल बक्षीस काय मिळत असेल, तर ताईचा ओरडा आणि आईच्या हातचे धम्मकलाडू अन्, चापटपोळ्या! पण हे सगळे वरवर असते बरे का? पाहुणे गेल्यावर माझा एक गालगुच्चा घेऊन आई दोन खरे लाडू हातावर ठेवते. पण हा अन्याय मला पसंत नसतो. एवढ्या मोठ्या कामाबद्दल धम्मकलाडू, चापटपोळ्या! ओरडा (खोटा असला म्हणून काय झाले?)








सकाळी पेपर हातात घ्यावा तर ताईसाहेब म्हणतात, "अग, एवढा पसारा टाकून वाचत काय बसलीस? उठ पाहू आधी." अजित वाडेकरचा पराक्रम अर्धा टाकून मग उठावे लागते! बरे, आवरून बसावे—तर लगेच म्हणते, "मला दे पाहू वाचायला पेपर." मात्र ह्या पेपर वाचत असताना आम्ही मागितला की म्हणतात कशा, "मोठी माणसं काही वाचत असताना असं मागू नये."

ताईने जर मला मारले तर मी मात्र तिला बोलायचे नाही. का? तर ती मोठी बहीण ना? हा काय न्याय झाला?

म्हणून मंडळी, हे अन्यायनिवारण करण्यासाठी मी बेमुदत, दणदणीत, खणखणीत, झणझणीत (बटाटेपोहे नाही तर चिवड्यासारखे) उपोषण करणार आहे.

अगबाई, एक मिनिट हं. स्वयंपाकघरातून कसलासा खमंग वास सुटलाय्? थांबा हं मंडळी, आईने जे काही केलंय ते खाऊन बसतेच बघा उपोषणाला!!

किशोर-कॅमल रंगस्पर्धा
निकाल पुढील अंकी


लिलाधरमामाच्या गोष्टी
इंजिन यात्रा
कथा: विजय तेंडुलकर
चित्रे: श्यामजोशी
लिलाधरमामाच्या नेपोलियनच्या शब्दकोषात 'अशक्य' हा शब्द नव्हता.
मामा, वाफेच्या इंजिनाच्या ड्रायव्हरची मजा असेल नाही ?
ठाऊक नाही. पण आपण पाहू या की एकदा. त्यात काय मोठे ? चलो.
या इंजिनाचे ड्रायव्हरसाहेब कुठे आहेत ?
नमस्कार! मी याचा मामा. आपली ओळख करून घ्यावी म्हणून आम्ही दोघे आलो.
आमच्या दिप्याला तुमच्याबरोबर इंजिनातून फिरायचे आहे.
फिरवू की.
हे आपल्यासंगत येणार.
वेल - कम.



मामा, दिवसा या आगीमुळे उकडलं पण आता थंडी लागत नाही. उबदार वाटतंय.
काय ??
गाडी कधी सुरू होणार ?
सिग्नल मिळेल तेव्हा. तो आत्ता मिळेल नायतर उद्या सकाळला पण मिळेल.
एक विडी टाक.
तुम्हांला भीती नाही वाटत ?
वाटून कसा चालेल ? आपला काम हा असा हाय ना. त्यातच जिंदगी गेली. रात नाय, बेरात नाय...
सिग्नल मिळाला.
काय झालं ? काय झालं ?
रातच्या पारी खाली पिली...
मेला कोण तरी...
मरायला रूळावरच आली...
नशीब, माणूस नव्हता...
असं नेहमी होतं ?
होय. म्हणून राती, दिवसा, पावसात वादळामधी ड्रायव्हरला रूळावरती डोळ्यामधी तेल घालून ध्यान द्यावं लागतो न्.


ड्रायव्हर, ड्रायव्हर, ते बघा लांब कोण हात हलवते आहे!
काय तरी गडबड हाय.
रूळाची फिशप्लेट काढली हाय. मला अचानक दिसली बघा.
आयला.
म्हणजे गाडी थांबली नसती तर...
फिश प्लेट काढल्या. घातपाती प्रकार असावा.
दोघे पळतांना दिसले... चेहरे दिसले नाहीत...
यांचंच कशावरने नसेल...?
पण मग हाच गाडी कशाला रोखेल?
मामा, गाडी किती थांबणार? मला कंटाळा आला.
तुला इतका आला. ड्रायव्हर आणि गार्डाला किती येत असेल? पुन्हा जोखीम केवढी! आणि त्यात एकेकदा प्राणाशी गाठ... आपल्या... इतरांच्या...
पूर्वी मला वाटे, तुमची म्हणजे मजा. पण आता कळलं, तुमचं काम फार अवघड आहे.
डिकरा, काम अवघड असतो म्हणून करण्यात जीद असतो. आणि जगण्यात जीद नसेल तर काय राहील? कीड, मुंगीचा नि आपला लाइफ सारखाच मग. जीद पायजे जीद. तवच जगण्यामंदी मजा हाय बग...
जीद पायजे जीद.

पुढील अंकी चालू

महाराष्ट्र बँक सादर करीत आहे

# चित्रबोध - शब्दशोध





महाराष्ट्र बँकेत, चौदा वर्षांच्या मुलामुलींना आपल्या नावाने खाते सुरू करता येते.
आता पहिली गोष्ट तुम्ही कोणती करणार ?
अर्थातच महाराष्ट्र बँकेत तुमच्या नावाचे खाते उघडणार !
मग उशीर कशाला ?


हे चित्रांचे शब्दकोडे आहे. चित्राना व चौकोनांना क्रमांक दिले आहेत. प्रत्येक चित्र पाहून त्यात दिसणाऱ्या वस्तूचे नाव, वर्णन, माणसाच्या चेहऱ्यावरील भाव, निसर्गदृश्य इत्यादींवरून सूचित होणारा योग्य शब्द चौकोनात भरायचा आहे.



कोड्याचे उत्तर पुढील अंकी

# आकाशदर्शन

## जानेवारी

बाबूराव प. सावे

जानेवारी महिन्यात यंदा पौष महिन्याचा बराचसा भाग येतो. पौष शु. सप्तमीपासून अमावास्येपर्यंत. त्यामुळे रात्री पुष्य नक्षत्राचे जणू राज्य आहे असे समजायचे. संध्याकाळी ते नक्षत्र सूर्यास्ताच्या सुमारास उगवणार व पहाटेस मावळणार. रात्रीच्या सुरवातीस ८-९ च्या सुमारास व नंतर पूर्वेकडे तोंड केल्यास पुढीलप्रमाणे काही ठळक नक्षत्रे दिसतील.




(१) कृत्तिका—प्लीडीझ
(२) रोहिणी—अल्डेबैरान
(३) मृग—ओरायन
(४) व्याध—सीरिअस
(५) आर्द्रा—गामाजेमिनी
(६) पुनर्वसु—जेमिनी
(७) पुष्य—कॅन्सर
(८) आश्लेषा—झेटाहायड्रा
(९) मघा—रेग्युलस
(१०) पूर्वा-फाल्गुना—थिटालिओ
(११) उत्तरा-फाल्गुना—डेनेबोला

### पूर्वेकडे तोंड केल्यास

साधारणपणे आपल्या डोक्यावर कृत्तिका नक्षत्राचा पुंजका आलेला दिसेल. हा सहा-सात तारकांचा एकत्र समूह जरी विशेष तेजस्वी नसला तरी सहज लक्षात येतो. त्याच्या-जवळच थोड्या पूर्वेस रोहिणी नक्षत्र. इंग्रजी 'ए' सारखा तारकांचा समूह आणि दक्षिणेकडच्या पायातील तो तेजस्वी तारा. तो तेजस्वी ताराच मुख्य व त्यालाच रोहिणी तारा असे आपण म्हणतो. रोहिणीचे तांबूस-पिवळे तेज मोठे आकर्षक वाटते.


थोडे पूर्वेस असलेले हे भले मोठे तेजस्वी मृगनक्षत्र सर्वांच्याच परिचयाचे आहे. त्याचे वर्णन मागे आलेच आहे. त्या मृगावर बाण मारणारा तो व्याधही पूर्वेस; पण थोडा उजव्या बाजूस आहे. सर्व नक्षत्रांत हा व्याध तेजस्वी असल्यामुळे तो सहज लक्षात येतो. शिवाय त्याच्याकडे आपण निरखून पाहिल्यास दिसून येईल की, त्याच्या लुकलुकण्यात किती निरनिराळे रंग चमकत आहेत. व्याध बराच वर येईपर्यंत हे रंग दिसतील.

मृगानंतर आर्द्रा अंधुकच दिसेल. पुढे पुनर्वसु. हे तारे तर ठळकच आहेत. त्यानंतर मात्र पुष्य व आश्लेषा ही नक्षत्रे बरीच अंधुक असल्यामुळे थोडी शोधावीच लागतील. त्यांच्यापुढचे मघा नक्षत्र थोडे ठळक असल्याने ते प्रथम पाहावे. म्हणजे, पुनर्वसु व मघा यांच्यामध्ये पुष्य व आश्लेषा यांचा तपास करता येईल. वरील आकृतीची मदत घ्या. मघा व पुढची पूर्वा-फाल्गुना व उत्तरा-फाल्गुना ही नक्षत्रे मिळून एक सिंहासारखी आकृती दिसेल.

आता या जानेवारी महिन्यात १ ते ११ तारखेपर्यंत चंद्राचा प्रकाश विशेष असणार. ८ तारखेस पौर्णिमा. तोपर्यंत चंद्र मोठा होणार. पुढे दोन-तीन दिवस रात्रीच्या सुरवातीस चंद्र उगवणार. त्यामुळे त्या दिवसांत फक्त तेजस्वी नक्षत्रे आपणांस व्यवस्थितपणे दिसतील. इतर सर्व लहान-मोठी नक्षत्रे १२ तारखेपासून पुढे रात्रीच्या सुरवातीस चांगली दिसावयास पाहिजेत. अर्थातच आकाशही निरभ्र हवे. २४ तारखेच्या पुढे माघ महिन्यातील चंद्र पश्चिमेस असेल. परंतु त्याची कोर लहान असणार.

मृग नक्षत्राच्या जवळच—डाव्या बाजूस ब्रह्महृदय व अग्नि हे तारे सहज ओळखता येतील. पुनर्वसूच्या आसपास हल्ली शनि ग्रह आहे. त्याच्या स्थिर तेजावरून तो ग्रह आहे, हे आपण ओळखू शकतो. तारे सर्व लुकलुकतात. शनि ग्रह त्या ठिकाणी आणखी पुष्कळ महिने दिसणार आहे.

आता आपण उत्तरेकडे तोंड केल्यास कोणकोणती नक्षत्रे दिसतील, ते या पुढील आकृतीच्या मदतीने पाहू या.




(१) शर्मिष्ठा—कॅसिओपिआ (२) देवयानी—ॲन्ड्रोमेडा
(३) ययाती—पर्सिअस (४) ब्रम्हहृदय—कापेला
(५) उत्तरध्रुव

## उत्तरक्षितिज

कृत्तिका नक्षत्र साधारणपणे डोक्यावर असल्यास शर्मिष्ठा थोडी पश्चिमेकडे झुकलेली दिसेल. तिच्या त्या मोडक्या खुर्चीच्या उत्तरेकडील टोकावरून आपणांस उत्तर ध्रुवतारा शोधता येईल. विशेष तेजस्वी नाही. परंतु, आसपास तेवढाही तेजस्वी तारा नाही. आपल्याकडील क्षितिजावर सुमारे १६° ते २२° अंश ध्रुवतारा दिसेल. शिवाय त्याची अंधुक शेपटी, जिला आपण ध्रुवमत्स्य म्हणतो, तीही लक्षात येईल. शेजारी उजव्या बाजूस ब्रह्महृदय व अग्नि हे ठळक तारे आहेतच. त्यांना जोडणाऱ्या रेषेतून मध्यभागी लंब काढून तो उत्तरेकडे वाढवल्यास अंदाजाने ध्रुवताऱ्यातून जाईल.

शर्मिष्ठा व ब्रम्हहृदय यांच्यामध्ये देवयानी व ययाती ही नक्षत्रे आहेत. ध्रुवाजवळची ही सर्व नक्षत्रे जणू काही ध्रुवाभोवतीच फिरतात असे दिसून येते. वर्षातून निरनिराळ्या वेळी ही नक्षत्रे पाहिल्यास ही गोष्ट लक्षात येईल.

या वेळेस पश्चिमेकडे पाहिल्यास पूर्वा-भाद्रपदा व उत्तरा-भाद्रपदा यांचा तो प्रचंड चौकोन पश्चिमेकडे झुकलेला दिसतो. हंस व अभिजित जवळजवळ मावळण्याच्या स्थितीत असतील. भाद्रपदा व डोक्यावरच्या कृत्तिका यांच्यामध्ये अश्विनी व भरणी ही नक्षत्रे दिसतील. आकृती पाहा—





(१) कृत्तिका—प्लीडीझ् (२) भरणी—४१ एरीज
(३) अश्विनी—एरीज
(४) उत्तरा-भाद्रपदा } पेगॅसस
(५) पूर्वा-भाद्रपदा } (गॅमा व आल्फा)

## पश्चिमेकडे तोंड केल्यास

अश्विनी, भरणी व कृत्तिकेचा काही भाग, म्हणजे मेषराशी समजली जाते. सध्या या मेषराशीत मंगळ आहे. तेव्हा मंगळ ग्रह त्याच्या लालसर तेजामुळे सहज नजरेत भरतो. गुरू व शुक्रही रात्रीच्या सुरवातीस पश्चिमेस झुकलेले दिसतील. मंगळ, गुरू व शुक्र या सर्वांचे तेज कसे सुंदर व स्थिर आहे पाहा.


दक्षिणेकडे तोंड करून आपण उभ राहिल्यास अगस्तीचा तेजस्वी तारा आपण लगेच ओळखू. उजव्या बाजूस, पश्चिमेकडे झुकत असलेले तारेही पुढील आकृतीच्या साहाय्याने ओळखता येतील.




(१) अगस्त्य - कॅनोपस (२) यमुना - इरिडेनूस
(३) जटायू - फीनिक्स (४) तिमिंगल - सीटस

## दक्षिणेकडे पाहिल्यास

आपल्यापैकी पहाटेस कोण कोण उठतो? जानेवारीच्या सुरवातीसच पहाटेस काळोख असेल. पूर्वेकडे तोंड करून पाहिल्यास हस्त, चित्रा, स्वाती ही सुंदर नक्षत्रे बरीच वर आलेली दिसतील. पुढील आकृती पाहा.





(१) हस्त - कॉर्व्हस. (२) चित्रा - स्पायका.
(३) मित्र - आल्फा सेंटॉरी. (४) स्वाती - आर्क्टूरस.


## पहाटेस पूर्वेकडे

शिवाय यांच्या उजव्या बाजूस, दक्षिण दिशेकडे नक्षत्रांचे अनेक समूह दिसतील. आकाशात जणू कोणी सुंदर रांगोळ्या घातल्या आहेत, असा भास होईल. शहरापासून दूर, जेथे प्रकाशाचे स्रोत नाहीत, अशा ठिकाणी व काळोखी रात्र आणि निरभ्र आकाश अशी परिस्थिती असल्यास या सर्व नक्षत्रांचे सौंदर्य वर्णनातीत असेल. ते प्रत्यक्ष पाहाण्यातच खरा आनंद आहे.

# केवळ गंमत



बोल जंगलचा राजा कोण ?
आपणच सिंह महाराज !
बोल जंगलचा राजा कोण
आपणच महाराज !
बोल जाड्या जंगलचा राजा कोण
अरे वेड्या, माहीत नव्हतं तर नाही म्हणायचं .. मी सांगितलं असतं !
ज्ञानेश सोनार -




पाठ्यपुस्तक मंडळाने प्रकाशित केलेल्या पाठ्यपुस्तकांतील निवडक गीतांच्या श्रवणीय ध्वनिमुद्रिका आता विक्रीस तयार आहेत.

तरी शिक्षणसंस्था आणि इतरही ज्या कुणाला ह्या ध्वनिमुद्रिका हव्या असतील—त्यांनी खालील पत्त्यावर चौकशी करावी :

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'नीलम', वरळी, मुंबई-१८

एका ध्वनिमुद्रिकेची किंमत रु. ८·२५

सहा ध्वनिमुद्रिकांच्या एका संचाची किंमत रु. ४७·५०

श्री. बापूराव नाईक यांनी हे मासिक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकरिता उषा ऑफसेट प्रिंटर्स प्रा. लि. नॅशनल हाऊस, ६ टयूलॉक रोड, मुंबई १ येथे छापले आणि म. रा. पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, सेनापती बापट मार्ग, पुणे; ४, येथे प्रकाशित केले.